23 TO 29 OCTOBER 2023 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 10/21/2023 9:01 PM Page 1


|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ४४ सोमवार दि. २३ ऑक्टोंबर २०२३ ते रविवार दि. २९ ऑक्टोंबर २०२३ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## रक्ताच्या नात्याला मोबाईलची बाधा झाली जन्मदात्या आईची मुलानेच हत्या केली

नागपूर/क्राईम रिपोर्टर

मोबाईल ही सध्या जणू काही जीवनावश्यक वस्तू झाली आहे. रस्त्यावर कचरा वेचून पोट भरणाऱ्या भिकाऱ्यांपासून करोडपती व्यावसायिकांपर्यंत सर्वांकडेच मोबाईल असतो. खास करून आजकालच्या मुलांना मोबाईलचे भयंकर वेड आहे. आई–वडिलांनी मोबाईल घेऊन दिला नाही म्हणून काही शाळकरी मुलांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. तर नागपूरमध्ये आईने मोबाईलसाठी पैसे न दिल्याने एका मुलाने चक्क जन्मदात्या आईची ...पान ६ वर

## सायलेंट किलर बनून त्यांनी मृत्यूच्या दाढेत सोपवले कुटुंबातील पाच जणांना दोघींनी कायमचे झोपवले

गडचिरोली/क्राईम रिपोर्टर

**कोणताही माणूस अन्याय अत्याचार फार काळ सहन करू शकत नाही. कधीना कधी त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि सुडाची हीच भावना त्याला कोणताही टोकाचा निर्णय घ्यायला भाग पडते. जेंव्हा ती व्यक्ती टोकाचा निर्णय घेते तेंव्हा मग नातीगोती पाहत नाही किंवा असे केले तर पुढे काय परिणाम होतील याचाही विचार करीत नाही. सुडाच्या भावनेतून आजवर अनेक ठिकाणी नात्यागोत्यात रक्ताचे पाट वाहिले आहेत. मुलाने आई–वडिलांची हत्या केलीय. भावाने भावाची हत्या केली. पतीने पत्नीची हत्या केली. अशा कितीतरी घटना समाजात केवळ सुडाच्या भावनेतून घडतात. कारण ज्याच्यावर कुटुंबातील लोकांनीच अन्याय केलेला असतो त्याचं मन आणि भावना मेलेल्या असतात. त्याच्या नजरेत संताप हृदयात आग असते. काही लोक सुडाच्या आगीत होरपळत असले तरी ज्याच्यावर सूड उगवायचा असतो त्याचा अत्यंत थंड डोक्याने आणि योजनाबद्धरित्या काटा काढला जातो. गडचिरोलीमध्ये दोन महिलांनी एकत्र येऊन तब्बल २ महिने प्लान करून आपल्याच कुटुंबातील ५ जणांचे हत्याकांड घडवले. त्यासाठी थेलीयम रसायनाचा वापर केला. यातील संघमित्रा कुंभारे या महिलेचा सासरच्या मंडळीकडून छळ सुरु होता. या छळाच्या धक्क्यानेच तिच्या वडिलांनी आत्महत्या केली होती. त्यामुळे तिच्या मनात सूडाची भावना होती. तर संघमित्राच्या कुटुंबाने रोसा रामटेके या महिलेची वडिलोपार्जित जमीन हडपली होती याचा रोसाला राग होता. त्यामुळे या दोघींनी एकत्र येऊन इंटरनेटवर थेलीयमचा कसा वापर करायचा हे शोधले आणि त्यानंतर संघमित्राच्या संपूर्ण कुटुंबाला जेवणातून हे स्लो पोईझन देऊन कुटुंबातील ५ जणांची हत्या केली. यातील रोसा हि कृषी विभागाची तज्ज्ञ अधिकारी आहे. या दोघींनाही पोलिसांनी अटक केली आहे.**



संघमित्रा अकोला जिल्ह्यातील रहिवासी होती. तिचं डिसेंबर २०२२ मध्ये रोशन कुंभारेशी लग्न झालं. मात्र, या लग्नाला संघमित्राच्या कुटुंबाचा विरोध होता. या विरोधाला डावलून संघमित्राने रोशनशी लग्न केलं आणि ती त्याच्या घरी गडचिरोलीतील महागाव येथे आली. मात्र, लग्नानंतर काही दिवसातच संघमित्राचा हिरमोड झाला. तिला तिच्या नवऱ्याकडून मारहाण व्हायला लागली. त्यामुळे संघमित्रा कौटुंबिक हिंसाचाराला कंटाळली. सासरचे इतर लोकही रोशन संघमित्राला मारहाण करत असताना अपमानास्पद बोलत, अशी माहिती पोलिसांनी दिली. संघमित्राला सासरी होत असलेल्या त्रासाची माहिती तिच्या वडिलांना समजली. त्यानंतर तिच्या वडिलांनी एप्रिलमध्ये अकोल्यात गळफास घेत आत्महत्या केली. याने संघमित्राला धक्का बसला. रक्षाबंधनच्यावेळी संघमित्राला तिच्या माहेरी जायचं होतं. मात्र, तिचा नवरा रोशन आणि सासरच्या लोकांनी तिला माहेरी जाऊ दिलं नाही. तिने आग्रह केल्यानंतर घरात वाद झाला आणि रोशनने पत्नी संघमित्राला मारहाण केली. यानंतर संघमित्रा घराबाहेर रडत बसली. यावेळी रोसा रामटेकेने तिला आधार दिला. यावेळी संघमित्राने तिला सासरच्यांचा जीव घ्यावा वाटतो, अशी भावना रोसासमोर व्यक्त केली. रोसाचा संघमित्राच्या घरच्यांशी वडिलोपार्जित जमिनीवरून वाद होता. तिने संघमित्राच्या रागाला संधी म्हणून पाहत तिला भडकावलं. तसेच सासरच्यांना मारण्यासाठी तिला मदत करण्याचं आश्वासन दिलं. यानंतर संघमित्रा आणि रोसा दोघींनी खून करण्याच्या ...पान २ वर

## शातीर पत्नीच्या षडयंत्राचा पर्दाफाश झाला पतीचा खून करुन दरोड्याचा बनाव केला

अहमदनगर (श्रीरामपूर)/क्राईम रिपोर्टर

**आजकाल गुन्हेगारीत महिलाही मागे राहिलेल्या नाहीत. कित्येक महिलांनी कट रचून आपल्याच कुटुंबातील लोकांचा काटा काढल्याच्या घटना घडलेल्या आहेत. अहमदनगरच्या श्रीरामपूरमध्ये अशाच एका घटनेत एका महिलेने मध्यरात्रीच्या वेळी पतीची हत्या करून दरोड्याचा बनाव केला. आपल्या घरात दरोडेखोर शिरले व त्यांनी पतीला ठार मारून घरातले ७ लाख रुपये पळवले असे तिने सांगितले, पण पोलीस तपासात पत्नीचे बिंग फुटले व तिनेच पतीची हत्या केल्याचे उघडकीस आल्याने पोलिसांनी तिला अटक केली आहे.**




अहमदनगरच्या श्रीरामपूर दरोडा आणि हत्या प्रकरणाबाबत एक खळबळजनक माहिती समोर आली आहे. श्रीरामपूरच्या एकलहरे गावातील एका बंगल्यात दरोडेखोरांनी पतीची हत्या करत सात लाखांचा ऐवज पळवल्याची माहिती समोर आली होती. दरोडेखोरांनी पत्नीला देखील जखमी केले होते, असे पीडितेच्या वडिलांनी सांगितले होते. मात्र आता या दरोडा प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. पत्नीनेच पतीची हत्या करत बनाव रचल्याचे पोलीस तपासात समोर आलं आहे. एकलहरे गावातील रस्त्याच्या कडेला असणाऱ्या बंगल्यावर बुधवारी मध्यरात्री एक ते दोनच्या सुमारास दरोडा पडल्याची माहिती मृताच्या पत्नीने दिली होती. दरोडेखोरांनी पती नईम रशीद पठाण (४०) यांचा गळा आवळून खून केल्याचा दावा पत्नी बुशराने केला होता. दरोडेखोरांनी आपल्यावरही हल्ला केल्याचे बुशराने पोलिसांना सांगितले. तसेच त्यांनी घरातून रोख सात लाख रुपये व सोन्याचे दागिने लांबविण्यात अशी माहिती दिली होती. मात्र आता या प्रकरणाला धक्कादायक वळण लागलं आहे. नईम पठाण यांस पत्नीने बुशरानेच संपवल्याची हादरवणारी माहिती समोर आली आहे. पती नईमची हत्या केल्यानंतर बुशराने दरोड्याचा बनाव केला होता. बुशराने नईमला झोपेच्या गोळ्या खावू घातल्यानंतर त्याचा साडीने गळा आवळल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत या दरोडा प्रकरणाचा छडा लावला आहे. पोलिसांनी नईमची पत्नी बुशरासह आणखी दोन संशयितांना ताब्यात घेतलं आहे. या प्रकरणात आणखी कुणाचा सहभाग आहे का? हे पोलीस तपासानंतर स्पष्ट होणार आहे. मात्र या प्रकरणानंतर अहमदनगरमध्ये खळबळ उडाली आहे. एकलहरे– बेलापूर रस्त्यालगत नईम पठाण यांची शेतवस्ती आहे. नईम हे पत्नी ...पान ६ वर

## सॅनेटरी नॅपकीनने तपासाचा मार्ग दावला खरा मारेकरी अखेर तिच्या घरातच गावला

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर

**खुनासारख्या गंभीर घटनांचा तपास करताना एखादा छोटासा पुरावाही पोलिसांना खुन्यापर्यंत नेऊ शकतो आणि त्यानंतर पोलीस अक्षरशः सुतावरून स्वर्ग गाठण्याचे काम करतात. वांबोरी गावच्या कल्याणी जाधव या महिलेच्या खुनाचा उलगडा तिच्या मृतदेहा जवळ सापडलेल्या सॅनेटरी नॅपकीनमुळे झाला आणि कल्याणीचा खुनी तिचा पतीच निघाला. चारित्र्याच्या संशयावरून त्याने भाच्याच्या मदतीने पत्नीची हत्या केली होती. पण शेवटी पोलीस त्याच्यापर्यंत पोहचलेच.**





आरोपी महेश




आरोपी मयुर

शनिवार दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील राजुर पोलीस ठाण्यातील फोन खणखणला. कोणीतरी पोलीस ठाण्यात कातळपूर शिवारात एका अज्ञात महिलेचा मृतदेह पडल्याची माहिती दिली. ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रविण दाते हे आपल्या सहकाऱ्यांना घेवून घटनास्थळाकडे रवाना झाले. घटनास्थळावर २५ ते ३० वयोगटातील मध्यम शरीर बांध्याची एक महिला बेवारस स्थितीत निपचित पडली होती. तिच्या अंगावर छातीपर्यत बदामी रंगाचा, तर छातीपासून खाली गडद निळ्या रंगाचा टॉप होता. डाव्या बाजूला फाटलेला टॉप पांढऱ्या रंगाच्या धाग्याने शिवलेला होता. टॉपला छातीवर पत्र्याची दोन मोठी सफेद रंगाची बटणे होती. त्या महिलेच्या कपाळावर डाव्या बाजूस बारीस जखम झालेली दिसत होती. तिच्या डाव्या कानातून रक्त येत होते. त्या कानात काहीही दागिना नव्हता, मात्र उजव्या कानात सोनेरी रंगाची रिंग, दोन्ही हातात लाल रंगाच्या बांगड्या, दोन्ही पायात पांढऱ्या रंगाच्या pc-000 मार्क असलेल्या तोरड्या, दोन्ही पायाच्या बोटात जोडवे, डाव्या हाताच्या ...पान २ वर

## आंतरजातीय प्रेमविवाह सहन नाही झाला सैराट बापाने मुलीसह जावयाचा गेम केला

मुंबई/एस.कुमार

**प्रेमाच्या आड जात येते तेंव्हा समाज अशा आंतरजातीय विवाहांना मान्यता देत नाही. पण आजकालची तरुणाई जात पात मनात नाही. त्यामुळेच आजकाल मोठ्या प्रमाणात आंतरजातीय प्रेमविवाह होत आहेत. पण समाजाच्या किंवा घरच्यांच्या विरोधाला न जुमानता कुणी प्रेमविवाह केला कि त्या नवविवाहित जोडप्यांना किती भयंकर किंमत चुकवावी लागते हे सैराट या चित्रपटात बघायला मिळाले. तसाच काहीसा ऑनर किलींगचा प्रकार मुंबईच्य गोवंडीत घडला आहे. मुलीने हिंदू तरुणाशी आंतरजातीय प्रेमविवाह केला म्हणून तिच्या बापाने व भावाने मुलगी व जावयाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.**





गोवंडीमध्ये 'ऑनर किलिंग'चा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रेमविवाह केला म्हणून वडिलांनी आधी मुलीची आणि नंतर जावयाचा खून घडवून आणला. या घटनेने खळबळ उडाली आहे. समाजात आजही दोन भिन्न जातीचे तरुण–तरुणी प्रेमविवाह करून लग्न करू शकत नाही हे या घटनेवरून अधोरेखित झाले आहे. शनिवारी दि.१४ आक्टोबर रोजी गोवंडीच्या टेलिकॉम फॅक्टरी वसाहतजवळील भुतबावडी येथील विहिरीवर काही मुले पोहायला गेली होती.यावेळी त्यांना विहिरीत एका तरुणाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसला.मुले घाबरून पळून गेली. त्यांनी हा प्रकार परिसरातील रहिवाशांना सांगितला. जागृत नागरिकांनी या घटनेची माहिती गोवंडी पोलिसांना दिली.गोवंडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुदर्शन होनवडजकर हे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले.पोलिसांनी काही ...पान २ वर

## मायलेकी घरात फासावर लटकल्या काय झाले हत्या कि आत्महत्या?

इंदापूर/क्राईम रिपोर्टर



**काही घटना अशा काही संशयास्पद असतात कि त्याचा तपास करणे पोलिसांसाठी अवघड बनलेले असते. पुण्याच्या इंदापूर तालुक्यातील हगारेवाडी येथे मायलेकींचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळला. या प्रकरणी पोलिसांनी त्या महिलेचा पती, दीर व सासूवर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. मात्र ही हत्या कि आत्महत्या हे समजलेले नाही. पोलीस या प्रकरणी तपास करीत आहेत.**

इंदापूर तालुक्यातील हगारेवाडी येथे मायलेकींचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. राहत्या घरात दोघी मृतावस्थेत आढळल्या आहेत. ही हत्या आहे की आत्महत्या याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, पती सागरला पोलिस घेऊन जात असताना नातेवाईकांनी त्याला मारहाण केल्याचा प्रकारही घडला आहे. इंदापूर तालुक्यातील हगारेवाडी येथे मायलेकी मृतावस्थेत आढळून आल्याने या परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अश्विनी सागर म्हस्के वय २८ वर्ष व सानवी सागर म्हस्के वय ४ वर्षी अशी ...पान २ वर

## बायकांच्या भांडणात पुरुषांची गोची झाली मारुती नाईक याची शेजाऱ्याने हत्या केली

बेळगावी/क्राईम रिपोर्टर

**बेळगावी शेजारी राहणाऱ्या बायकांची कुठल्याना कुठल्या कारणावरून भांडणे होताच असतात. मात्र त्यांच्यातील वाद लवकर मिटवला नाही तर त्यातून कोणतीही भयंकर घटना घडू शकते. बेळगाव मधील अशाच एका घटनेत रवी नाईक आणि मारुती नाईक या दोन शेजाऱ्यांच्या बायकांमध्ये नेहमी भांडणे व्हायची आणि याच भांडणातून एके दिवशी रवी नाईक याने मारुती नाईक याचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी मारुती नाईक याला अटक केली आहे.**



गोजगा येथे मारूती नाईक हे पत्नी आई वडिल आणि दोन मुलासह जनता कॉलनी येथे राहयला आहेत.त्याच्या शेजारी त्याच्याच नात्यातील रवी नाईक ही आपल्या पत्नी मुलासह राहयला आहे.मारूती हे बेळगावी येथे एका कारखान्यात कामाला असून ते सकाळी लवकर कामाला जावून संध्याकाळी उशिरा घरी परतत होते.त्याच्या पत्नीचा स्वभाव हा भांडखोर आणि चिडखोर असा असल्याने तिचे सहसा कोणशीच पटत नव्हते. तिच्या या स्वभावामुळे तिचे तिच्या शेजारी राहणाऱ्या रवी नाईक याच्या पत्नीशी ही तिची कायम भांडणे होत होती.अगदी घरासमोर कचरा टाकण्यावरून ते किरकोळ कारणातून त्या दोघीचे कधीच एकमेकाशी पटत नव्हते. दररोज काही तरी कारण काढून त्या दोघी भांडत होत्या. त्या दोघीच्या भांडणामध्ये दुसरे शेजारी कधी भाग घेत नव्हते. कारण त्या दोघी तशा फटकळ तोंडाच्या असल्याने त्या दोघीही एकमेकीना नको त्या घाणेरडया शिव्या देत होत्या. मारूतीने बऱ्याच वेळेला आपल्या बायकोला समजावून सांगून तु कोणाबरोबर विनाकारण भांडणे काढत जावू नकोस असे सांगितले होते.परंतु त्याची बायको मुळातच भांडखोर असल्याने तिला रवीच्या बायकोशी भांडण काढल्या शिवाय चैन पडत ...पान २ वर

## संशयामुळे त्रिशरण भयंकर चिडला पत्नीच्या प्रियकराचा मुडदाच पाडला

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



मयत आकाश

**आपल्या कुटुंबातील महिलेचे खास करून पत्नीचे परपुरुषाबरोबर अनैतिक संबंध कुणीही सहन करू शकत नाही. नुसता संशय जरी आला तरी तो माणूस वेडापिसा होतो. वानखेडे गावातील जेसीबी चालक त्रिशरण याला त्याच्या बायकोचे शेजारच्या आकाश बरोबर अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. त्यातून बायकोबरोबर त्याची भांडणे व्हायची. शेवटी बायको कंटाळून माहेरी गेली. या सर्वाला आकाशच कारणीभूत आहे असे त्रिशरणला वाटत होते, त्यातून आकाश वरील त्याचा राग आणखी वाढला आणि एके दिवशी त्याने आकाशची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्रिशरण याला अटक केली आहे.**

दिनांक १० सप्टेंबर रविवार चा दिवस तामगांव पो.स्टे.चे कर्मचारी आपआपल्या कामात व्यस्त असतांना, दुपारी एक वाजण्याच्या सुमारास वानखेड गावचे पोलीस पाटील डाबरे यांनी पोलिसांना माहिती दिली की, वानखेड गावात एका २४ वर्षीय युवकास शेजारी राहणाऱ्या इसमाने ...पान ६ वर



आरोपी त्रिशरण

23 TO 29 OCTOBER 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 10/21/2023 9:02 PM Page 1



पान १ वरून...

## सायलंट किलर बनून त्यांनी मृत्यूच्या ...

पद्धतींविषयी गुगलवर माहिती मिळवण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी एक विषारी फुल खरेदी केलं. मात्र, ते जेवणात घातलं तर आपण पकडले जाऊ अशी भीती त्यांना वाटली. त्यांनी हे फुल जेवणात घालण्याचं रद्द केलं. त्यानंतर त्यांनी सप्टेंबर २०२३ मध्ये तेलंगणातून 'स्लो पॉयझन' मागवलं आणि जेवणातून सासरच्या लोकांना खाऊ घातलं. यानंतर या घरातील पाच जणांचा मृत्यू झाला, तर चालकासह अन्य दोन सदस्य रुग्णालयात उपचार घेत आहेत. अहेरी तालुक्यातील माहागाव या गावी एकाच कुटुंबातील लागोपाठ पाच जणांच्या गूढ मृत्यूने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. या मृत्यूसत्राचा उलघडा करण्यात अखेर पोलिसांना यश आले असून सून आणि मामीला पाच जणांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आली आहे. सासरच्या छळाला कंटाळून सुनेने तर संपत्तीच्या वादातून मामीने मिळून हा कट रचल्याचं समोर आलं आहे. या दोघींनी अन्न आणि पाण्यातून विष देत थंड डोक्यानी हे हत्याकांड घडवून आणले. शंकर तिरुजी कुंभारे (५२), विजय शंकर कुंभारे, त्यांची विवाहित कन्या कोमल विनोद दहागावकर (२९, रा. गडअहेरी ता. अहेरी), मावशी आनंदा उराडे (५०, रा. बेझगाव ता. मूल जि. चंद्रपूर), मुलगा रोशन शंकर कुंभारे (२८) अशी मयतांची नावे आहेत. सून संघमित्रा रोशन कुंभारे (२५) व रोशनची मामी रोजा रामटेके (५२) या दोघींना पोलिसांनी अटक केली आहे. २२ सप्टेंबरला रात्री जेवण केल्यावर विजया शंकर कुंभारे यांची तब्येत बिघडली. डोकेदुखी व उलट्या होऊ लागल्याने पती शंकर तिरूजी कुंभारे यांनी त्यांना चंद्रपूरला नेले. त्यानंतर शंकर यांचीही प्रकृती खालावली. दोघांनाही उपचारादरम्यान नागपूरला हलविले. उपचार सुरु असताना २६ रोजी शंकर तर २७ रोजी विजया यांची प्राणज्योत मालवली. ही घटना घडली तेव्हा विवाहित कन्या कोमल विनोद दहागावकर (२९,रा.गडअहेरी ता.अहेरी) माहेरी होती. प्रकृती खालावल्याने चंद्रपूरला नेताना ८ ऑक्टोबरला वाटेत तिने प्राण सोडले. शंकर कुंभारे यांचा मोठा मुलगा रोशन कुंभारे (२८) याचा १५ ऑक्टोबरला सकाळी आठ वाजता उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्याची मावशी आनंदा उंदीरवाडे (५०, रा. बेझगाव ता. मूल जि.चंद्रपूर) ही अंत्यविधीसाठी महागावला आली होती. चंद्रपूर येथे खासगी दवाखान्यात उपचारादरम्यान १४ ऑक्टोबरला मध्यरात्री तिची प्राणज्योत मालवली. तर रोशनच्या आई-वडिलांना दवाखान्यात नेणारा खासगी वाहनचालक राकेश अनिल मडावी (रा.महागाव) याच्यावर नागपूर, रोशनचा मावसभाऊ बंटी उंदीरवाडे (रा.बेझगाव ता.मूल जि.चंद्रपूर) याच्यावर चंद्रपूर व रोशनचा भाऊ राहुल हा दिल्लीत उपचार घेत आहे. या सर्वांची प्रकृती स्थिर आहे. लागोपाठ होणाऱ्या मृत्यूसत्रानंतर अहेरी ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. उपअधीक्षक डॉ. सुदर्शन राठोड आणि पोलिस निरीक्षक मनोज काळबांडे यांनी तपास सुरु केला. हा घातपाताचा प्रकार असल्याचा संशय असल्याचे स्पष्ट झाले. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी १८ ऑक्टोबरला पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली. अपर अधीक्षक यतीश देशमुख, कुमार चिंता, अनुज तारे, उपअधीक्षक डॉ. सुदर्शन राठोड उपस्थित होते. संघमित्रा ही मूळची अकोला जिल्ह्यातील असून ती अहेरी येथे पोस्टात कर्मचारी होती. रोशन कुंभारे हा पण त्याच ठिकाणी कर्मचारी होता. त्यांचं सुत जुळलं आणि काही महिन्यांपूर्वी त्यांनी लग्न केले. संघमित्राने घरच्यांचा विरोध असतानाही रोशन सोबत लग्न केले आणि त्यातून तिच्या वडिलांनी आत्महत्या केली. त्यादरम्यान रोशनला पदोन्नती मिळाली आणि तो सिरोंचा तालुक्यात रुजू झाला. मात्र, संघमित्रा आपल्या कर्तव्यावर हजर नसल्याने तिला नोकरीवर परत घेतले नव्हते अशी माहिती आहे. वडील गेले, नौकरी गेली त्याच्या बदल्याची आग आणि दुसऱ्या एका नातेवाईकेचे संपत्तीच्या लालसेपोटी वाटणीतील वाटेदारच संपवून टाकण्याची मनीषा यातून दोघी एकत्र येऊन संपूर्ण कुटुंबच संपविण्याचा घाट घातला. थंड डोक्याने, नियोजनबद्ध काम करत रंगहीन, पाण्यात विरघळणारे विष ज्याचा हळूहळू परिणाम होतो, ते वेगवेगळ्या वेळी जेवणातून आणि पाण्यातून देत पाच जणांची निघृण हत्या केली. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरून गेला होता. परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सदर घटनेची राज्यभर चर्चा सुरू असतानाच गडचिरोली पोलिसांनी या रहस्यमय मृत्यूचे गूढ उकडले हे विशेष.

## सॅनेटरी नॅपकीनने तपासाचा मार्ग ...

दंडावर जुन्या जखमेचे व्रण, तसेच डाव्या डोळ्याच्या भुवईवरती जुन्या जखमेचे व्रण, मधला भाग लाल व दोन्ही बाजूस काळे पट्टे असलेली ओढणी, एक सैंडल, गुलाबी रंगाची पर्स जवळच पडलेली, पर्समध्ये सॅनिटरी नॅपकीनचे रॅपर, त्यावर For use of Zillha Parishad Ahamadnagar only. Not for sale असे लिहिलेले होते. पोलीस पथकाने महिलेचा मृतदेह तसेच घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केले. पोलीस कॉन्स्टेबल अशोक शशिकांत गाढे यांनी राजुर पोलीस ठाण्यात दिलेल्या खबरीवरून सी. आर. पी. सी. १७४ प्रमाणे अप मृत्यू रजि. नं. २३/२०२३ ला नोंद करण्यात आली. पंचनाम्याचे सोपस्कार आटोपल्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवण्यात आला. सदर महिलेचा मृत्यू गळा आवळून झाल्याचे डॉक्टरांनी वैद्यकीय अहवालात नमूद केल्याने राजूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरूद्ध गुन्हा रजि. नं. २५४/२०२३ भा.दं.वि. ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलिस प्रमुख राकेश ओला यांना या घटनेची माहिती देण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांना या घटनेचा समांतर तपास देण्यात आला. कोणत्याही प्रकारच्या अकस्मात मृत्युच्या गुन्ह्यात विशेषत: बेवारस मृतदेह सापडल्यास त्याची ओळख पटवणे जिकिरीचे काम असते. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार एल.सी.बी. चे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, हेडकॉन्स्टेबल देवेंद्र शेलार, रविंद्र कर्डिले, लक्ष्मण खोकले, विशाल दळवी, कॉन्स्टेबल रोहित बेमुल, सागर ससाणे, मच्छिंद्र हे अमृत आढाव, मेघराज कोल्हे, प्रशांत राठोड, महिला कॉन्टेबल शिरसेना काळे, रोहिणी जाधव, ताई दराडे, चालक हेडकॉन्स्टेबल उमाकांत गावडे, चंद्रकांत कुसळकर, अरुण मोरे, भरत बुधवंत अशा पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके तयार करून या खून प्रकरणाच्या मुळाशी जाण्याच्या सुचना दिल्या. एल.सी.बी.च्या पोलीस पथकाने घटनास्थळी राजुरजवळील कातळपूर शिवारात जावून समक्ष बारकाईने पहाणी केली. राजूर पोलीस स्टेशनकडून मयत महिलेच्या फोटोसह वर्णनाची तपास बादी जिल्ह्यात तसेच जिल्ह्यातील जवळच्या भागातील पोलीस स्टेशनला पाठवली होती. तिचा पाठपुरावा करण्यात आला. तपास यादीतील वर्णनाची महिला आपल्या पोलीस स्टेशन हद्दीतून बेपत्ता आहे का? त्याची चौकशी करण्यास सुरुवात करण्यात आली. कातळपूरसह राजुरजवळील बराचसा परिसर पोलिसांनी पिंजून काढला. मयत महिलेच्या पर्समध्ये मिळून आलेल्या वैद्यसृष्टी सॅनिटरी नॅपकीनच्या रॅपरवर (पाकिटावर) जिल्हा परिषद यांचे वापराकरता असे लिहिलेले होते. त्यामुळे पोलीस पथकाने अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अधिका-यांकडे संपर्क करण्यात आला. त्यांनी सांगितले की वैद्यसृष्टी सॅनिटरी नॅपकीन हे महिला व बालविकास विभागाअंतर्गत अंगणवाडी सेविकांना देवून त्यापुढे अनुसूचित जमातीच्या महिलांना वितरित केले जातात. ही खात्रीलायक माहिती मिळाल्या नंतर पोलीस पथकाने लागलीच महिला पोलिसांच्या मदतीने अंगणवाडी सेविकांच्या व्हॉटसअप ग्रुपमध्ये घटनास्थळावर मिळालेल्या मयत महिलेचे फोटो प्रसारीत केले. सॅनिटरी पॅडच आपल्याला खुन्यापर्यंत घेवून जाईल याची खात्री पोलीस पथकाला होती. हे सॅनिटरी पॅड फक्त अनुसूचित जातीच्या महिलांकरताच होते. इतर समाजातील महिलांना ही सुविधा नव्हती, त्यामुळे मयत महिला ही अनुसूचित जातीचीच असावी हा निष्कर्ष पोलिसांनी काढला. आशा सेविका, अंगणवाडी ताई यांच्या व्हाटस ॲपवर मेसेज व त्या महिलेचा फोटो टाकल्यानंतर अपेक्षित ते घडले. त्यानंतर पोलीस पथकाला वांबोरी येथून एक फोन आला आणि जी महिला कल्याणी महेश जाधव असल्याचे सांगण्यात आले. मयत महिलेचे नाव कळल्यानंतर त्या महिलेच्या घराचा शोध घेतला गेला. राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील राजवाड्यात पोलीस जावून धडकले. तिच्या घरी पोहोचले त्यावेळी घरामध्ये तिचा नवरा महेश जाधव हा होता. पोलिसांनी महिलेचा फोटो त्याला त्या मृतक दाखवला असता 'ही माझी 'पत्नी' नाही असे त्याने सांगितले. पोलिसांनी त्यानंतर सोनई पोलीस ठाण्यात चौकशी केली की कल्याणी महेश जाधव ही मिसींग असून त्यासंदर्भात तक्रारदेखील दाखल आहे. त्याचवेळी पोलिसांना महेश जाधव याच्यावर संशय येवू लागला, पण तसे न दाखवता त्यांनी मोबाईल लोकेशन, सीडीआर, तसेच अन्य काही तांत्रिकदृष्टया तपास सुरू केला. तेंव्हा पोलिसांना धक्कादायक बाब लक्षात आली की महेश आणि त्याचा भाचा मयुर यांच्यामध्ये वारंवार संपर्क होत आहे. मोबाईल लोकेशनही अकोले, कातळापूर असे दाखवत होते. या संदर्भाने महेश जाधव याच्याकडे विचारणा केली असता तो भलतीच माहिती देवून पोलिसांची दिशाभूल करत होता. आता पोलिसांनी आपले अस्त्र बाहेर काढले आणि त्याचा परिणाम अपेक्षेप्रमाणे झाला. पोलिसांनी महेश जाधव आणि त्याचा मयुर अशोक साळवे याची स्वतंत्रपणे चौकशी करायला सुरूवात केली आणि सत्य बाहेर पडले. राहुरी तालुक्यातील बांबोरी येथील रहिवासी असलेला महेश जनार्दन जाधव हा आपली पत्नी कल्याणी समवेत रहात होता. गेल्या काही दिवसांपासून महेशला पत्नीच्या चारित्र्याविषयी संशय येवू लागला होता. कल्याणीचे बाहेर लफडे असावे असे त्यास वाटत होते. या कारणावरून दोघांमध्ये बादही होत होते. महेशला कल्याणीविषयी पक्का संशय होता. आपल्या पत्नीला धडा शिकवायचा असे विचार त्याच्या मनात येत होते. यासंदर्भात त्याने आपला भाचा मयुरला विचारले. दोघांनीही यावर बरीच चर्चा केली आणि कल्याणीला संपवूनच टाकायचे असा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी पूर्वनियोजित प्लॅन तयार केला. कल्याणीला बाहेर फिरण्यासाठी न्यायचे आणि तिकडेच तिची हत्या करायची असा तो प्लॅन होता, त्यासाठी त्यांनी डोंगराळ, निर्जन असे ठिकाण निवडले. अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तरेकडील डोंगराळ आदिवासी तालुका अकोले हे ते ठिकाण होय. त्यानंतर महेशने कल्याणीला आपण भंडारदऱ्याला फिरायला जायचे आहे सांगितले. तीन-चार दिवस अगोदरच त्याने कल्याणीला फिरायला जाण्याची बाब सांगितली होती. यामागे तिची फिरायला जाण्याची मानसिक तयारी करण्याचा उद्देश होता, त्यानुसार- कल्याणीही फिरायला जाण्यासाठी उत्सुक झाली.

दि. ३० जुलै २०२३ रोजी महेश जाधव आणि त्याचा भाचा मयुर हे राजुरजवळील कातळापूर येथे मोटरसायकलवरून जावून आले होते. तेथील ठिकाणाची पहाणी केली होती. कल्याणीला कुठे न्यायचे, कसे मारायचे हा सगळा प्लॅन त्यांनी तयार केला. सगळे काही ठरल्यानंतर आपला प्लॅन दि. ३ ऑगस्ट २०२३ रोजी यशस्वी करण्याचे त्यांनी ठरवले. गुरूवार दि. ३ ऑगस्ट २०२३ रोजी महेश, त्याची बायको कल्याणी आणि भाचा मयुर हे तिघे जण सकाळी-सकाळीच फिरायला जायचे म्हणून एकाच मोटरसायकलवरून बांबोरी गावातून बाहेर पडले. कल्याणीलाही फिरायला आपण जात आहोत याचा आनंद झाला होता. खूप दिवसांनी ती भंडारदरा येथे निघाली होती. रमत-गमत हे तिघे जण अकोलेकडे जात असतांना नगर-मनमाड हायवेने कोल्हार भगवतीपर्यंत प्रवास जोमात झाला. प्रवास करतांना त्यांनी वाटेत नाष्टा पाणीही घेतले. लोणी- संगमनेर मार्गे अकोल्याच्या दिशेने ते निघाले होते. वाटेत सर्वांना भूक लागली, तेव्हा त्यांनी एके ठिकाणी जेवणही केले. अकोलेहून ते आता घाटाने राजुरच्या दिशेने निघाले होते. काही मिनिटातच राजुरजवळ आले. राजुरहून भंडारदरा (विल्सन डॅम) धरण जवळच असल्याने काही वेळातच ते धरणाच्या भिंतीवर पोहोचले. पाऊसमान चांगला झाला असल्याकारणाने धरण बऱ्यापैकी भरले होते. धरणातील पाण्याच्या लाटा उसळत होत्या. तसतसे महेश जाधवच्या मनात तरंग येत होते. तो फक्त आता टाईमपास करत होता. कधी एकदाची संध्याकाळ होते अन् कल्याणीच्या नरडीचा घोट घेतो असे त्याला झाले होते. दिवस मावळतीकडे जात असतांनाच त्या तिघांनी भंडारदरा धरण बघून झाल्यावर फिरत- फिरत ते कातळापूर शिवारात येवून पोहोचले. अतिशय निर्जन ठिकाण होते ते. विरळ लोकवस्ती असलेले ते ठिकाण होते. ठरल्याप्रमाणे त्यांनी मोटरसायकल त्याठिकाणी थांबवली. मयुर मागेच रेंगाळत येत होता. महेश आणि कल्याणी मात्र दोघे चालत चालत पुढे आले. समोरच्या खडकावर दोघे नवरा-बायको बसले. त्याचवेळी महेश कल्याणीला लघुशंका करून येतो असे म्हणाला. कल्याणीने पर्समध्ये ठेवलेला मोबाईल बाहेर काढला आणि ती मोबाईल बघू लागली. लघुशंकेसाठी पाठीमागे गेलेला महेश पुढे न जाता तो मागे फिरला. कल्याणी मोबाईल पहाण्यात गर्क असल्याचे त्याला दिसले. त्याने तीच संधी साधून खिशातून आणलेला दोरी बाहेर काढली आणि त्याचा फास करून कल्याणीच्या गळ्याभोवती करकचून आवळला. त्याचा भाचा मरही त्याठिकाणी आला. गळा आवळला जात असतांना कल्याणी हात-पाय झाडू लागली, मात्र त्या हवानांना तिची दया आली नाही. कल्याणी मेल्याची खात्री पटल्यानंतर त्यांनी तिच्या पर्समधील आधारकार्ड व इतर कागदपत्रे काढून घेतली, तेथे शिक्षक होते पैंजण (तोरडी) आणि सैनिटरी पैड, ज्याच्या आधारेच पोलीस खऱ्या आरोपीपर्यंत पोहोचले. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हमंत थोरात, एल. सी. बी. चे कर्मचारी आणि राजुर पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी दोघा आरोपींच्या मुसक्या आवळल्या. आरोपी गुन्हा करून गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी दि. ४ ऑगस्ट रोजी सोनई पोलीस स्टेशनमध्ये कल्याणी मिसींग झाल्याची खबर द्यायला गेले होते. या घटनेतील मयुर अशोक साळवे हा उच्चशिक्षीत तरूण असून तो एअरटेल कंपनीत कामाला आहे, त्यामुळे त्याने कल्याणीच्या खुनापासून ते पोलीस त्यांच्यापर्यंत संपर्क करेपर्यंत तांत्रिकदृष्ट्या भरपूर काळजी घेतली होती. त्यांनी कल्याणीची मिसींग दाखल केली, तेंव्हा त्यांनी जे नंबर दिले होते तेदेखील खरे होते. 'मी सर्व काही सेटींग लावली आहे. आपले लोकेशन वगैरे दिसणार नाही' अशी खात्री मयुरने महेश मामाला दिली होती, मात्र पोलीस पुढचे पाऊल टाकत अखेर त्यांच्यापर्यंत पोहोचले. पोलिसांनी बारकाईने अभ्यास करून सुतावरून मार्ग काढला एका शासकीय योजनेतील सॅनिटरी नॅपकीनमुळे कल्याणीची ओळख पटली होती. तेथून पुढे आरोपीपर्यंत पोहोचण्याचा पोलिसांचा मार्ग सुकर झाला. पोलिसांनी महेश जाधव आणि मयुर साळवे या दोघांना ताब्यात घेतले. दोघेही जेलची हवा खात आहेत.

## आंतरजातीय प्रेमविवाह सहन नाही ...

रहिवाशांच्या मदतीने विहिरीतील मृतदेह बाहेर काढून त्याची पाहणी केली. साधारण २० ते २२ वर्ष वयोगटातील अनोखळी तरुणाचा तो मृतदेह बघून पोलिसांनी आजूबाजूला या तरुणाबद्दल विचारणा केली परंतु त्याची ओळख पटली नाही.अखेर पोलिसांनी पंचनामा करून तो मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शताब्दी रुग्णालयात पाठवा. या प्रकरणी गोवंडी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करून गुन्ह्याचा पुढील तपास परिमंडळ ६चे पोलीस उपायुक्त उपायुक्त हेमराजसिंह राजपूत आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुदर्शन होनवडजकर यांच्या मार्गदर्शनाखाली गोवंडी, ट्रॉम्बे, टिळकनगर, चेंबूर व शिवाजीनगर पोलिस ठाण्यातील पोलिसांची दहा पथके तयार करण्यात आली. तपासादरम्यान घटनास्थळी पोलिसांना पाकिटात चिठ्ठी सापडली. त्या चिठ्ठीत एक मोबाईल नंबर लिहिलेला होता.पोलिसांनी त्या नंबरवरून तपासाची चक्रे फिरवल्यावर तो मृतदेह उत्तर प्रदेश येथील रहिवासी करण रमेश चंद्र याचा असल्याचे निष्पन्न झाले. करणची हत्या झाल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान करण आणि गुलनाज खान या दोघांनी प्रेमविवाह केल्याचे समजले. या प्रेमविवाहाला घरच्यांचा विरोध होता. गोवंडी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवल्यावर धारावीत राहणारा गुलनाजचे वडील गोरा रईमुद्दीन खान यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान खान यांनी मुलगा सलमान आणि चार जणांच्या मदतीने करणची हत्या केल्याची कबुली दिली.करणच्या हत्येनंतर गुलनाजचादेखील काहीच पत्ता नव्हता. त्यामुळे तिच्या बाबतीतही वडील आणि भावाकडे कसून चौकशी करण्यात आली. पोलिसांच्या उलटसुलट प्रश्नांपुढे बापलेकाचे पितळ उघड झाले. गुलनाज हिची हत्या करून तिचा मृतदेह नवी मुंबई येथे फेकल्याची माहिती दोघांनी दिली. त्यानुसार पोलिसांनी नवी मुंबईत जाऊन गुलनाजचा मृतदेह ताब्यात घेतला. हत्या करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून गोरा रईमुद्दीन खान, त्याचा मुलगा सलमान, मित्र मोहम्मद कैफ नौशाद खान यांना अटक केली; तर तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले. इच्छेविरुद्ध प्रेमविवाह केल्यामुळे त्यांची हत्या केल्याचे बापलेकांनी सांगितले. करण रमेश चौरसिया ( वय २२) आणि गुलनाज खान (वय २०) हे दोघे युपीतल्या आजूबाजूच्या गावात राहणारे. करण आणि गुलनाज यांचे सूत जुळले आणि त्यांनी गेल्या वर्षी लग्न केले. मग दोघांनी घरातून पळून जाऊन दिल्ली गाठून तेथे आपला संसार थाटला.गुलनाजचा बाप गोरा खान त्यांच्या या कृत्यामुळे चिडला होता. त्याला त्यांचे लग्न मान्य नव्हते. काही दिवस तो शांत राहिला. मात्र, त्याने दोघांचाही खून करण्याचे ठरवले.यासाठी त्याने मुलगा सलमान तसेच मोहम्मद सैफ खान (१८) व अन्य काहींना हाताशी धरून मुलगी आणि जवायला ठार मारण्याचा डाव रचला. ठरल्याप्रमाणे गोरा खानने मुलीशी संपर्क साधला आणि तिला गोडीगुलाबीने मुंबईत येण्यास भाग पाडले. १४ आक्टोबर रोजी जावई करणं याला खरेदीच्या बहाण्याने गोवंडीच्या टेलिकॉम फॅक्टरी वसाहतजवळील भुतबावडीत येथे घेऊन जाऊन त्याचा मुलाच्या आणि इतर सहकार्याच्या मदतीने धारदार चाकूच्या साहाय्याने गळा चिरून करणची हत्या केली त्यानंतर त्याचा मृतदेह तेथील एका विहिरीत फेकून दिला.तर मुलगी गुलनाज हिची कारमध्ये गळा आवळून हत्या केली. त्यानंतर एके ठिकाणी तिचा चेहरा दगडाने ठेचला आणि मृतदेह कळंबोली येथे खाडीत फेकल्याचे बाप- लेकाने सांगितले. तसेच टेलिकॉम फॅक्टरीतल्या विहिरीतला मृतदेह गुलनाजचा पती करणचा असून त्याचीही आम्हीच गळा चिरून हत्या केल्याची कबुली त्यांनी दिली. करणं आणि गुलनाज खान या दोघांची हत्या करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी गोवंडी पोलिसांनी कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून गोरा रईमुद्दीन खान (वय ५०), त्याचा मुलगा सलमान(वय २२) मित्र मोहम्मद कैफ नौशाद खान (वय२३) यांना अटक केली; तर तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले. इच्छेविरुद्ध प्रेमविवाह केल्यामुळे त्यांची हत्या केल्याचे तपासात उघड झाले आहे, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## मायलेकी घरात फासावर लटकल्या...

मृतांची नावे आहेत. आज शनिवारी दुपारी पावणे एकच्या सुमारास या दोघींचे मृतदेह राहत्या घरातील पत्र्याच्या अँगलला दोरीच्या सहाय्याने लटकल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर शेजाऱ्यांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोघींचे मृतदेह उतरवण्यात आले आहेत. मात्र, ही आत्महत्या की हत्त्या याचा शोध वालचंदनगर पोलीस घेत आहेत. दरम्यान, वालचंदनगर पोलीसांनी मृत महिलेच्या पतीला ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या त्याच्यावर संशय असून त्याला ताब्यात घेऊन जात असताना संतप्त नातेवाईकांना सागर म्हस्के याला चांगलाच चोप दिल्याचा प्रकार घडला आहे. मात्र, सतर्क असलेल्या पोलिसांनी कशीबशी त्याची जमावाकडून सुटका करुन त्याला गाडीत बसवले व पोलिस ठाण्यात नेले. माय-लेकींच्या संशयास्पद मृत्यूच्या घटनेने हगारेवाडी परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. तसंच, जोपर्यंत आरोपींना अटक केली जात नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याचा पवित्रा नातेवाईकांनी घेतला आहे. याप्रकरणी पोलिसांनी अश्विनी हिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पती, दीर व सासूवर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी पती सागर तात्याराम म्हस्के, दीर शेखर तात्याराम म्हस्के, व सासू सिताबाई तात्याराम म्हस्के यांच्यावर आत्महत्सेस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. आज शुक्रवार (ता. २०) रोजी पावणेएकच्या सुमारास अश्विनी व सानवी या दोघींचे मृतदेह घरातील लोखंडी ॲंगलला लटकलेले आढळले. पोलिसांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर वालचंदनगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विक्रम साळुंखे, उपपोलिस निरीक्षक मिलिंद मिठ्ठापल्ली, विजय टिळकेकर, विनोद पवार, प्रमोद तापसे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. दोघींचे मृतदेह शवविच्छेदनासाठी इंदापूरमध्ये पाठविण्यात आले आहेत. अश्विनी हिचे माहेर निमगाव केतकी असून माहेरकडील माणसे तातडीने घटनास्थळी आली होती. दोषींना अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा घेतल्याने तणावाचा वातावरण झाले होते. याप्रकरणी तात्यासाहेब आण्णा भोंग यांनी वालचंदनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली पोलिसांनी पती, दीर व सासूवरती आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात सहायक पोलिस निरीक्षक विक्रम साळुंखे यांनी सांगितले की, या घटनेमध्ये अश्विनी हिने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली. तर चार वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाला असून आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून तपास सुरु आहे.

## बायकांच्या भांडणात पुरुषांची गोची...

नव्हती. रवीची बायको ही तिच्या पेक्षा काही कमी नव्हती. ती ही तिला भांडणात नको त्या शिव्या देवून खाली खेचत होती.दोघीचे भांडणे म्हणजे जनता कॉलनीला तमाशाच झाला होता. भांडता भांडता त्या दोघी ही एकमेकीच्या अंगावर जात असल्याने त्याची भांडणे सोडवयाला मारूतीला आणि रवीला जावे लागत होते. त्यावेळी ते दोघे ही आपआपल्या बायकांना आवरत घरात नेत होते. तरी ही त्या दोघीच्या तोंडाचा पट्टा चालू असायचा. त्या दोघीना किती ही गप्प राहयला सांगितले तरी त्या काही गप्प राहत नव्हत्या. त्याची भांडणे सोडविताना रवीला आणि मारूतीला नाकी नउ येत होते. बायकाच्या भांडणात हल्ली मारूती आणि रवीची ही भांडणे होत होती. ते दोघे ही आपआपल्या बायकाची बाजू घेऊन भांडत असताना दोघात मारामारी ही होत होती. त्या भांडणात एकदा दोनदा रवीने मारूतीला तुला जिंवत ठेवत नाही अशी धमकी ही दिली होती. दोघे ही तुझ्या बायकोला समजावून सांग नाही तरी त्याचे परिणाम वाईट होतील असे सांगत होते. पण कितीही केले तरी दोघाच्या बायका भांडणात ऐकत नव्हत्या. त्यामुळे मारूतीला आणि रवीला त्या दोघीना ही अवरताना कठीण होत होते. जनता कॉलनी तशी आदर्श कॉलनी होती.पण मोजक्या लोकाच्या भांडणामुळे बदनाम होत होती. रवी नाईकच्या घराच्या समोरून गटार असल्याने त्या गटारीत शेजारी राहणाऱ्या मारूती नाईक याची बायको मुद्दामच कचरा टाकत होती. त्यामुळे त्या दोघीत भांडण होत होते.मारूतीच्या बायकोने टाकलेल्या कचऱ्याने रवीच्या घरासमोर गटारीत पाणी तुबूंन राहत होते. त्यामुळे दुर्गंधी आणि डास होत होते.रवीच्या बायकोने मारूतीच्या बायकोला तु कचरा टाकू नकोस असे सांगितले तरी ती मुद्दाम कचरा टाकत होती. मागे एकदा दोनदा मारूती हा आपल्या बायकोची बाजू घेऊन बोलत असताना रवी त्याला मारायला गेला होता. त्याची ही भांडणे पोलीस स्टेशनपर्यंत गेली असल्याने पोलीसांनी दोघाच्या ही बायकांना आणि त्यांना समज देवून सोडून दिले होते. भांडखोर व्यक्तीमुळे कधी कोण अडचणीत येईल हे सांगता येत नाही नेमकी तिच गत मारूतीची झाली होती. त्याच्या बायकोच्या भांडखोर स्वभावामुळे त्याची पंचायत झाली होती.एक तर भांडण सोडवायला गेले पाहिजे नाही तर घरात तिच्याकडून बोल खायला लागत होते. तो तर तिची किती वेळा बाजू घेऊन बोलणार होता. चुकत तर त्याच्या बायकोचे होते. त्यामुळे त्याला मान खाली घालयला लागत होते. शनिवार दि.१४ ऑक्टोंबर २०२३ रोजी दुपारी २ वाजणेच्या सुमारास त्याच्या बायकोचे आणि रवीच्या बायकोची भांडणे लागली होती. त्या भांडणात त्या दोघी ही एकमेकांना अर्वाच्च भाषेत शिव्या देत एकमेकीच्या अंगावर मारहाण करायला जात होत्या. त्यावेळी सकाळी कामावरून लवकर येवून मारूती घरात झोपला होता. काही केले तर त्या दोघीची भांडणे मिटत नव्हती.म्हणून तो बाहेर आला. तो आपल्या बायकोला समजावून सांगत घरात ओढून नेत असताना रवीच्या बायकोने शिव्या देत मारूतीला बुळगा बापयं असे म्हटले याचा राग धरून परत मारूतीची बायको तिच्या अंगावर तिला मारायला गेली. त्यावेळी रवी ही घरात होता.दोघीची भांडणे चालली आहेत.त्या भांडणात त्या दोघी ही गप्प बसत नाहीत हे त्याला ही माहित होते. त्याचवेळी मारूतीने ही रवीच्या बायकोला शिवी गाळ केली याचा राग रवीला आला.तो रागाच्या भरात घरातून विळा घेऊन बाहेर आला. त्याच विळ्याने त्याने भांडणाऱ्या मारूतीच्या पोटात दोन तीन वेळा वार केला.त्या सरशी मारूती हा गंभीर जखमी होऊन खाली पडला. चार लोकात त्याने मारूतीवर विळ्याने वार केला होता. कोणाला काही समजण्याच्या रवी त्याचेवर वार करून घरात निघून गेला होता. त्याचेवर वार होताना लोक बघतच थांबले होते. नवऱ्यावर रवीने विळ्याने वार केल्याने त्याच्या बायकोला झिंज्या धरत खाली पाडत तिला लाथाबुक्क्यांनी तुडवू लागली. तोपर्यंत मारूती हा रक्ताच्या थारोळ्यात गंभीर होऊन पडला.हे पाहून काही लोकांनी त्याला एका खाजगी गाडीत घालून बेळगावी येथील जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथे त्याचेवर उपचार सुरू असताना काही तासातच त्याचा उपचारदरम्यान मृत्यू झाला. कुणी तरी या घटनेची माहिती काकती पोलीस स्टेशनला दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून सदरची घटनाही कोणत्या कारणातून घडली आहे याची माहिती घेतली. घटनास्थळी पोलीस उपायुक्त पी.व्ही स्नेहा काकती पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.विजयकुमार सिन्नुर यांनी भेट देवून माहिती घेतली आणि पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. या घटनेची लेखी तक्रार मयत मारूती नाईक याचे वडिलांनी काकती पोलीस स्टेशनला दिली. त्याच्या तक्रारीवरून पोलीसांनी या घटनेतील सशंयीत आरोपी रवी नाईक याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन काकती पोलीस स्टेशनला आणले. त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता तो सुरूवातीला पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. मारूती गुंडू नाईक (वय ३५) रा.जनता कॉलनी गोजगा याच्या खून प्रकरणी पोलीसांनी रवी बंडू नाईक (वय ३२) रा.जनता कॉलनी, गोजगा याचे विरोधात आयपीसी कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याची जिल्हा आरोग्या रूग्णालयात वैदकीय तपासणी करून त्याला मा.कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला विळा जप्त केला. या घटनेचा पुढील तपास काकती पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. शेजाऱ्याबरोबर मिळून मिसळून राह त्याच्याशी प्रेमाने वागा असे जरी सांगण्यात येत असले तरी बऱ्याच शेजाऱ्यात किरकोळ कारणातून भांडणे ही होत असतात. ही भांडणे कधी विकोपाला जातील याचा काही नेम नाही. त्यातच बायकांची भाडणे तर काही विचारण्याची सोय नसते. त्याच्या भांडणात पुरूषांनी कधीच भाग घेऊ नये असे म्हणतात परंतु कुणी आपल्या बायकोला मारायला लागले तर कोण गप्प बसत नाही अगदी तसाच प्रकार गोजगी येथे झाला.मारूतीला रवीच्या बायकोने अपशब्द वापरला. तर मारूतीने ही रवीच्या बायकोला शिव्या घातल्या त्याचा विपरीत परिणाम होऊन रवीने मारूतीवर विळ्याने वार करून त्याला मारून टाकले हेच या घटनेवरून दिसून येते.

23 TO 29 OCTOBER 2023 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 10/21/2023 9:02 PM Page 1



### पाथरीच्या प्रभारी तहसिलदार यांचा गजब कारभार

# अवैध मुरुम वाहतूक करणारा हायवा ट्रक कारवाई न करता परस्पर दिला सोडून

## जिल्हाधिकारी यांनी तात्काळ दिले चौकशीचे आदेश

**पाथरी/प्रतिनिधी**

पाथरी तालुका हा नेहमीच गौण खनिज चोरीसाठी नेहमीच चर्चेत राहणारा तालुका आहे. त्यातच काल ११ ऑक्टोबर २०२३ बुधवार रोजी एक हायवा संबंधित सज्जाचे तलाठी अदनान अन्सारी यांनी हायवा पकडला व पंचनामा करुन तो हायवा तहसिल कार्यालय लावण्यात आला, परंतु तो हायवा तहसिलदार यांनी सोडुन दिला आहे.




सविस्तर बातमी अशी की, काल ११ आक्टोबर २०२३ रोजी पाथरी तहसिल अंतर्गत येणाऱ्या देवगाव सज्जाचे तलाठी अदनान अन्सारी यांनी अवैध मुरुम वाहतुक करणारा हायवा (ट्रक) पकडला व पंचनामा करुन तो हायवा पाथरी तहसिल कार्यालय येथे लावण्यात आला व संबंधित हायवाचा पंचनामा तहसिल कार्यालयात देवेगाव सज्जाचे तलाठी अदनान अन्सारी यांनी सादर केला, परंतु संबंधित हायवा मालकाने पाथरी तहसीलचे प्रभारी तहसिलदार यांच्या आशिर्वादाने हायवा तहसिल कार्यालयातुन घेवुन गेला. याबाबत आमचे प्रतिनिधी यांनी सदरील प्रकरणी विचारणा केली असता सदरील वाहन मालकाकडे वाहतुक परवाना असल्याचे सांगत तो हायवा सोडुन दिल्याची माहिती दिली. परंतु आमचे प्रतिनिधी यांनी सदरील प्रकरणाचा खोलवरचची माहीती काढली असता समोर आलेली माहिती अशी आहे की, सदरील हायवा मध्ये मुरुम असल्याने तो हायवा संबंधित सज्जाचे तलाठी यांनी लावला. त्या हायवा चालकाकडे पावती देखिल आढळुन आलेली नव्हती परंतु वाहन मालकाने पावती असल्याचे सांगत पावती देखील पाथरी तहसीलच्या कर्मचाऱ्यांना दाखवली असता सदरील पावती ही दगड-खडीची आढळुन आली. तरीही पाथरीचे प्रभारी तहसीलदार यांनी दगड-खडीची परवानगी असताना मुरुम असताना देखिल तो हायवा सोडला कसा हे मात्र गुलदस्त्यात आहे.

### ज्यांचे संमती पत्र त्यांच्या नावे जमीनच नाही

जो हायवा पकडला होता त्या हायवा मालकाने एक पावती आणली ती पावती दगड-खडी असलेली परवानगी होती. परंतु ज्या शेतातील उत्खनन व वाहतुकीची परवानगीसाठी संमती पत्र जोडले आहे, त्या शेतकरी इंदुमती किशनराव गलबे यांच्या नावाचे शेतीच नसल्याचे सातबारावर आढळुन आले आहे. सदरील प्रकरणी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्याशी फोनवरुन ही बाब लक्षात आणुन दिली असता त्यांनी तात्काळ पाथरीचे प्रभारी तहसीलदार यांनी आदेश देऊन सदरील प्रकरणाची स्थळपाहणी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

## पावसाने पाठ फिरवतात भिवंडीतील मोठ्या नाल्यांमध्ये साचला कचरा!



**भिवंडी/प्रतिनिधी**

ऑक्टोंबर महिनाभरापासून पावसाने पाठ फिरवली असल्याने शहरातील नाल्यांमध्ये कचऱ्याचे ढीग साचले आहेत. जून महिन्यात महापालिका प्रशासनाने नालेसफाईवर कोट्यावधी रुपयांचा खर्च केला होता त्यानंतरही शहरातील नाले सफाई व्यवस्थित झाली नसल्याची ओरड स्थानिक नागरिकांनी केली होती. नालेसफाई व्यवस्थित न झाल्याने पावसाळ्यात शहरातील अनेक सखल भागांमध्ये पावसाचे पाणी साचले होते. सध्या महिनाभरापासून पावसाने उसंत दिल्या नंतर शहरातील मुख्य रस्त्यांवरील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. त्यामुळे नालेसफाई वर महापालिका प्रशासनाने केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या उधळींचा पितळ उघडे पडले आहे. भिवंडी कल्याण मार्गावर साईबाबा मंदिराच्या बाजूला असलेल्या नाल्यात प्रचंड कचरा साचला आहे अशीच परिस्थिती शहरातील इतरही नाल्यांची झाली आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### ११ वर्षीय शाळकरी मुलाची आत्महत्या

वसई: नायगाव पूर्वेच्या वाकीपाडा काजू प्लॉट परिसरात ११ वर्षीय शाळकरी मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. बुधवारी दुपारी १२ च्या सुमारास ही घटना घडली महेश शंकर राठोड (११) असे या मुलाचे आहे.नायगाव पूर्वेच्या वाकीपाडा येथे काजू प्लॉट परिसर आहे या भागात एका चाळीत महेश हा मुलगा आपली आई शांता राठोड व लहान भाऊ यांच्या सोबत राहत होता. व इयत्ता कर्मवीर भाऊराव पाटील शाळेत तो इयत्ता सातवीमध्ये शिकत होता. वडील नसल्याने आई घरकाम करून मुलांचा सांभाळ करीत आहे. नेहमीप्रमाणे बुधवारी आई घरकामासाठी गेली होती. घरी कोणी नसल्याने महेश या मुलाने घरात ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन स्वतःचे जीवन संपविले. गळफास कोणत्या कारणामुळे घेतला याचे कारण अजून समजले नसून याप्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. याचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घडलेल्या घटनेमुळे परिसरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

### लातूरमध्ये मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र समिती अध्यक्षचां दौरा

लातूर : मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहीत करण्यासाठी गठित केलेल्या समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) व समिती छत्रपती संभाजीनगर विभागाचा जिल्हानिहाय दौरा करीत आहेत. ही समिती २६ ऑक्टोबर २०२३ रोजी लातूर दौऱ्यावर येणार असून नागरिकांनी त्यांच्याकडील कागदोपत्री पुरावे समितीसमोर सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता समितीची बैठक होणार असून जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्याकडील उपलब्ध निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूली पुरावे, निजाम काळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेज इ. समितीस उपलब्ध करुन द्यावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले आहे. तसेच नागरिकांकडील पुरावे तालुकास्तरावर तहसील कार्यालयातही सादर करता येईल. सर्व तहसील कार्यालयांमध्ये एक खिडकी सुरु करण्यात आली असून वरील पुरावे स्वीकारले जात आहेत, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

### अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे यांची गांधी तीर्थला भेट

जळगाव : अमळनेर येथे होणाऱ्या ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी १६ रोजी जैन हिल्स येथील गांधी तीर्थला आवर्जून भेट दिली. यावेळी जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी त्यांचे हृद्य स्वागत केले. जैन हिल्स येथील गांधी तीर्थ पाहून डॉ. रवींद्र शोभणे यांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केली ती अशी, गांधी तीर्थ म्हणजे जैन हिल्स परिसरात श्रद्धेय भवरलालजी जैन यांनी केलेला चमत्कार होय. ही केवळ दगडा मातीची इमारत नाही तर विचारांना आदान-प्रदान करणारी, मागच्या पिढीपासून पुढच्या पिढीपर्यंत विचार व आदर्शाचा तो अव्याहात प्रवाह आहे. त्या प्रवाहातून समाज घडवण्यासाठी, आदर्शाची रुजवत करण्याकरीता निर्माण केलेले असे अति भव्य हे शिल्प आहे. हे गांधी तीर्थ पाहून मला अतिव आनंद झाला. महात्मा गांधीजींचे विचार, त्यांच्या चळवळी, एकूणच भारतीय स्वातंत्र्याच्या ध्यासातील प्रत्येक पानाचे डॉक्युमेंटेशन अतिशय चांगल्या पद्धतीने प्रस्तुत केले आहे. महात्मा गांधीजी समजून घ्यायचे असतील तर जळगावच्या गांधी तीर्थ ला प्रत्यक्ष भेट द्यायलाच हवी.

### शिवाजीराव भिकाणेंची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

लातूर : भाजपचे ज्येष्ठ नेते व एकलव्य सेवा समितीचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव भिकाणे यांची भाजप ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा एकलव्य परिवारातील कर्मचार्यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव सचिन भिकाणे, मुख्याध्यापक एम. पी. नामपल्ले, एस. एन. आलापुरे, जी. आर. काळे, के. एच. आडे, पर्यवेक्षक एस. एन. बेंबडे, एस. ए. जाधव, यु. व्ही. पिनाटे, प्रा. बी. डी. कतुरे, प्रा. एस. एम. गुंडरे, प्रा. एल. एम. शेख, टी. पी. राठोड, एस. एच. कांबळे, आर. एस. हरवाडीकर, व्ही. एस. ढवळे यांच्यासह परिवारातील अन्य प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

### महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या ऑनलाईन प्रवेशासाठी मुदतवाढ

लातूर : महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामध्ये पाचवी ते आठवीसाठी नव्याने प्रविष्ठ होणाऱ्या व जानेवारी-फेब्रुवारी, २०२४ मध्ये होणाऱ्या मुल्यमापन सत्रासाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन नाव नोंदणी प्रवेश अर्ज स्वीकारण्यास १५ ऑक्टोबर, २०२३ (रात्री ११.५९ वाजेपर्यंत) या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. नांव नोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी १५ ऑक्टोबर, २०२३ (रात्री ११.५९ वाजेपर्यंत) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज भरावेत. १८ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, विहीत शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमुद केलेल्या संपर्क केंद्र शाळेमध्ये जमा करावेत. २३ ऑक्टोबर, २०२३ रोजी संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत शुल्क, मुळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळात जमा करावेत. वरील नमुद कालावधीमध्ये मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता पाचवी व आठवीसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांनी http://msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळाचा वापर करावा.

## भिवंडीत पावणेसात लाखांचे एमडी अंमली पदार्थ जप्त; एकास अटक

**भिवंडी/प्रतिनिधी**



राज्यात अवैद्य ड्रग्स प्रकरण गाजत असतानाच भिवंडीत पावणेसात लाख रुपये किमतीचे ११० ग्रॅम एमडी वजनाचे अमली पदार्थ जप्त करून याप्रकरणी गुरुवारी एकास अटक केली आहे. हिमांशु दिपेंद्र सिंग, वय २६ रा.न्यू कणेरी पद्मानगर असे अटक आरोपीचे नाव आहे. एक संशयित व्यक्ती एमडी हा मादक पदार्थ घेऊन भादवड येथे विक्रीसाठी येणार असल्याची माहिती गुप्त बातमीदारा कडून शांतीनगर पोलिसांना मिळाली असता पोलोसांनी सापळा रचून केलेल्या कारवाईत संशयितास ताब्यात घेत त्याची अंग झडती घेतली.त्यावेळी त्याच्या जवळून ६ लाख ७१ रुपये किमतीचा ११० ग्रॅम वजनाचा एम डी पावडर व मोबाईल असा एकूण ७ लाख २१ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास शांतीनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे करीत आहेत.

## शहापूरमध्ये १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर वारंवार सामूहिक अत्याचार, पाचही नराधम अद्याप फरार

**शहापूर/प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यात १५ वर्षीय अल्पवीयन मुलीवर सात नराधमांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना दोन दिवसापूर्वीच उघडकीस आली होती. त्या पाठोपाठ शहापूर तालुक्यात एका गावातील पाच नराधमांनी १५ वर्षीय अल्पवीयन मुलीवर सामूहिक बलात्कार केल्याची घटना समोर आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे पाच आरोपीपैकी चार जण विधीसंघर्ष बालक असल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले असून पाचही आरोपींचा शोध पोलीस घेत आहे.



पोलीस सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, १५ वर्षीय अल्पवयीन पीडित मुलगी कुटुंबासह शहापूर तालुक्यातील एका गावात राहते. तर त्याच गावातील पाच नराधमांची वाईट नजर पीडितेवर सप्टेंबर २०२३ पासून होती. त्याच महिन्यात गणपती बसण्यापूर्वी गावातील पाच नराधमांनी पीडित मुलीच्या घरात घुसून तिचे नाक तोंड दाबून तिला उचलून घरानजीक असलेल्या गवतात बळजबरीने नेले. त्यानंतर पाचही नराधमांनी पीडितेवर आळीपाळीने बलात्कार केला. तर या घटनेमुळे पीडिता भयभीत झाल्याने बदनामीच्या भीतीने घडलेला प्रकार कोणाला सांगितला नव्हता. त्यामुळे नराधमांची हिंमत वाढत गेली. त्यानंतर वारंवार पाचही नराधम बलात्कार करीत होते. दुसरीकडे वारंवार होणाऱ्या सामूहिक अत्याचाराच्या घटनेमुळे पीडित मुलीला त्रास असह्य होत असतानाच १७ ऑक्टोंबर रोजीही त्याच पाच जणांनी बळजबरीने गवतात नेऊन सामूहिक बलात्कार केला. दरम्यान या घटनेनंतर पिडीतेच्या घरच्यांना माहिती मिळताच पीडितेला घेऊन तिच्या आईने १८ ऑक्टोंबर रोजी शहापूर पोलीस ठाण्यात धाव घेतली. घडलेल्या प्रसंगाचे कथन करताच पोलिसांनी पिडीतेच्या आईच्या तक्रारी वरून भादंवि कलम ३७६, (२), (ए) ३७६ (डी ) तसेच पोक्सोचे कलम ४, ६ प्रमाणे पाचही नराधमांवर गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्यांचा शोध सुरु केला. या संदर्भात शहापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अनंत पराड यांच्याशी संपर्क साधला असता पाच जणांवर अत्याचाराह पोक्सो कायदयानुसार गुन्हा दाखल केला असून गुन्हा दाखल झालेल्या पाच आरोपीपैकी चार अल्पवयीन आहेत. या पाचही जणांना पकडण्यासाठी पोलिसांची दोन पथके रवाना केली असून लवकरच त्यांना ताब्यात घेऊन पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## दातांचे आणि सामान्य आरोग्य निरोगी राखण्यासाठी सॅटेलाईट क्लिनिक मदतीचे ठरेल -डॉ. हनुमंत कराड



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहरातील नागरीकांना दंत रोग व फिजिओथेरपी उपचार सेवा परिसरात उपलब्ध करुन देण्यासाठी डी.एस.कराड दंत चिकित्सालय आणि फिजिओथेरपी क्लिनिक सुरु करण्यात आले आहे. लोकांचे दंत आरोग्य आणि सामान्य आरोग्य निरोगी राखण्यासाठी हे दोन्ही सॅटेलाईट क्लिनिक मदतीचे ठरतील, असा विश्वास कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी व्यक्त केला.माईर एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय व नेत्र प्रतिष्ठान संचलित डी. एस. कराड दंत चिकित्सालय, फिजिओथेरपी क्लिनिक यांचा शुभारंभ आणि ‘अल्कॉन सेंचुरियन व्हिजन सिस्टिम’ या अत्याधुनिक मोतीबिंदू फेको शस्त्रक्रिया मशिनचे अनावरण डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. गेल्या दिड दशकापासून एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या माध्यमातून दंत आरोग्य व फिजिओथेरपी उपचार सेवा देवून हजारो रुग्णांना व्याधीमुक्त करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे लातूर शहरातील खाडगाव रोड व लातूर तालुक्यातील रुई रामेश्र्वर येथे यापुर्वी सुरु करण्यात आलेले सॅटेलाईट क्लिनिक लोकांसाठी सोयीचे ठरत आहेत, असे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, याचाच एक भाग म्हणून लातूर शहरातील बार्शी रोड व एमआयडीसी परिसरातील नागरीकांच्या सोयीसाठी दंत चिकित्सालय, फिजिओथेरपी क्लिनिक सुरु करण्यात आले आहे.हे सॅटेलाईट क्लिनिक सर्व अत्याधुनिक सोयींनी सज्ज असून येथील रुग्णांवर तज्ञ डॉक्टरांकडून योग्य व खात्रीशीर उपचार करण्यात येतील आणि जास्तीत जास्त रुग्णांना याचा फायदा होईल. सर्व सामान्य आरोग्याइतकेच दंत आरोग्य महत्वाचे आहे. लोकांचे दंत आरोग्य चांगले ठेवण्यासाठी व सामान्य आरोग्य सुदृढ राखण्यासाठी हे सॅटेलाईट क्लिनिक प्रयत्नशील राहील.लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेवटच्या रूग्णांपर्यंत दंत आरोग्य आणि फिजिओथेरपी उपचार सेवा पोहचणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी सॅटेलाईट क्लिनिकच्या उभारणीसाठी सर्वतोपरी मदत करणार असल्याची खात्री डॉ. कराड यांनी दिली.समाजातील सर्व रुग्णांपर्यंत दंत आरोग्य सेवा या सॅटेलाईट क्लिनिकच्या माध्यमातून पुरवली जाईल, असे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांनी सांगीतले तर व्याधीमुक्त समाज निर्मीतीसाठी फिजिओथेरपी क्लिनिक कार्यरत राहील, असे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी सांगीतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जास्मीन फरास व प्रिती चेंकाळे यांनी केले तर शेवटी आभार दंत रोग तज्ञ डॉ. सोमनाथ गित्ते यांनी मानले. या कार्यक्रमासाठी एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय व डी. एस. कराड आय इन्स्टिट्युट येथील विभाग प्रमुख, डॉक्टर, कर्मचारी, विद्यार्थी, रुग्ण व नागरीक उपस्थित होते.

## कारच्या भीषण अपघात; दोघांचा जागीच मृत्यू





**अंबरनाथ/सुनिल तांबे**

मध्यरात्री एका भरधाव कारवरील नियंत्रण सुटल्यामुळे कारला भीषण अपघात घडला असून या अपघातात उल्हासनगरच्या दोघा तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मानव राकेश थरवानी आणि कौशल थवानी अशी मृतांची नावे आहेत, दोघेही उल्हासनगरच्या गोलमैदान परिसरात आपल्या कुटुंबासह राहत होते. कल्याण-बदलापूर राज्य महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे. मंगळवारी मध्यरात्री दोन वाजताच्या दरम्यान मानव थारवाणी आणि कौशल थवानी हे दोघे मित्र आपल्या खाजगी कारमधून अंबरनाथच्या दिशेने भरधाव वेगात जात असताना त्यांचे गाडीवरचे नियंत्रण सुटल्यामुळे या गाडीने रस्त्याच्या कडेला असलेल्या वृक्षाला जोरदार धडक दिली. ही धडक एवढी भयानक होती की संपूर्ण कार या धडकेत चेपली गेली. कारचा चालक मानव आणि त्याच्या शेजारी बसलेला कौशल या दोघांचाही जागीच मृत्यू झाला. हे दोघे उल्हासनगरहून अंबरनाथकडे जात असताना कारला अपघात झाला. कार झाडावर आदळल्याने दोघेही आत अडकले आणि त्यांना दरवाजा उघडता आला नाही. एका प्रवाशाने घटनास्थळी धाव घेऊन त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, मात्र गाडीची अवस्था बिकट होती. त्यांनी स्थानिक पोलिसांना सतर्क केले. अपघाताची माहिती मिळताच अंबरनाथ पोलीस स्टेशनचे पोलीस देखील घटनास्थळी धावघेत दाखल झाले. या दोन्ही तरुणांचे मृतदेह कारमध्ये अडकल्याने त्यांना बाहेर काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. काही वेळातच त्यांना बाहेर काढण्यात पोलिसांना यश आले. त्यांना उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात नेले असता तेथे पोहोचण्यापूर्वीच त्यांना मृत घोषित करण्यात आले. याप्रकरणी अंबरनाथ पोलीस ठाण्यात कारचालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## इयत्ता दहावी परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र अर्थात इयत्ता दहावीच्या मार्च, २०२४ परीक्षेसाठी नियमित विद्यार्थ्यांचे अर्ज सरल डेटाबेसवरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. तसेच पुर्नपरीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीनुसार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे ट्रांन्सफर ऑफ क्रिडेट घेणारे विद्यार्थी) चे विषय घेवून प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीन www.mahahsscboard.in या संकेस्थळावर भरावयाचे असून २० ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर २०२३ या कालावधीत नियमित शुल्कासह हे अर्ज भरता येतील.माध्यमिक शाळांनी परीक्षा शुल्क आरटीजीएसद्वारे भरणा करणे व आरटीजीएस तथा एनईएफटी पावती, चलनासह विद्यार्थ्याच्या याद्या व प्री-लिस्ट जमा करावयाची तारीख नंतर कळविण्यात येणार आहे.सर्व विद्यार्थ्यांची अर्ज भरुन सबमिट केल्यानंतर अर्ज भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांच्या लॉगिनमधून प्री-लिस्ट उपलब्ध करुन दिलेली असेल, माध्यमिक शाळांनी त्यांची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत अर्जात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून अचूक असल्याची खात्री करावी. या प्रीलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्याची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केल्याबाबत मुख्याध्यापक यांनी प्रीलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी, असे लातूर विभागीय मंडळाचे विभागीय सचिव यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## सर्विस रोडवर पार्किंग केल्यास होणार १० हजाराचा दंड

लातूर : शहरातील रिंग रोड लगत असणाऱ्या सर्विस रोडवर वाहन चालकांनी पार्किंग करू नये.तेथे पार्किंग केल्याचे आढळल्यास मोठ्या वाहनांना १० हजार रुपये तर छोट्या वाहनांना ५ हजार रुपये दंड केला जाईल, असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे. शहरातील राजीव गांधी चौकापासून गरुड चौकाकडे जाणाऱ्या रिंग रोड लगत सर्विस रोड तयार करण्यात आला आहे. त्या परिसरातील नागरिकांना सोय व्हावी, हायवेवरील वाहनधारकांना त्रास होऊ नये व अपघात होऊ नयेत यासाठी हायवेच्या बाजूस सर्विस रोड तयार करण्यात आले आहेत. परंतु कांही वाहन चालक या रस्त्यावर आपली वाहने पार्क करत असल्याचे मनपाच्या निदर्शनास आले आहे. मात्र सर्विस रोडचा वापर पार्किंगसाठी केला जात आहे. या रस्त्यावर पार्किंग करू नये, असे निर्देश मनपाने दिले आहेत. यापुढे या सर्विस रोडवर वाहन पार्क केल्याचे आढळले तर ट्रक व इतर मोठ्या वाहनांना १० हजार रुपये आणि छोट्या वाहनांना प्रत्येकी ५ हजार रुपये दंड केला जाईल, असा इशारा मनपाकडून देण्यात आला आहे.

23 TO 29 OCTOBER 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 10/21/2023 9:03 PM Page 1



# तुरुंग, रुग्णालये आणि राजकीय गर्दुल्ले!

एक काळ असा होता की गुड टोळ्यांनी तुरुंगालाच आपले अड्डे बनवले होते. गुंड टोळ्यांचे माफिया सरदार तुरुंगात बसून आपल्या टोळ्या चालवायचे. खंडणी पासून खुनापर्यंत सर्व गुन्हे तुरुंगात बसूनच घडवून आणले जायचे. साध्या कैद्याला चपाती भाजी मिळाली नाही तरी चालेल, पण वेगवेगळ्या टोळ्या मधील अटकेत असलेल्या गुंडाना मात्र मटन-मच्छी पासून आयटमपर्यंत सर्व सुविधा पुरवल्या जायच्या. आजही मुंबईच्या आर्थर रोड तुरुंगापासून पुण्याच्या येरवडा जेलपर्यंत सर्वत्र हेच सुरू आहे. जेल प्रशासनाची या गुंडांबरोबर आर्थिक सेटिंग असते. त्यामुळे तुरुंगात त्यांना सर्व काही मिळत असते. तुरुंगात अटकेत असलेल्या माफियांना सर्व सुविधा दिल्या जातात, हे एक वेळ समजू शकते. परंतु आजकाल काही माफियांनी रुग्णालयाला आपले अड्डे बनवायला सुरुवात केली आहे. ड्रग माफिया ललित पाटील याचा ससून मधील मुक्काम आणि नंतर तिथून त्याच्या पलायनाच्या घटनेने रुग्णालयातील गैर प्रकार चव्हाट्यावर आले आहेत. कोणत्या ना कोणत्या गुन्ह्यात तुरुंगात असलेले कैदी, खास करून माफिया खोट्या आजारपणाचा बहाणा करून रुग्णालयांमध्ये ॲडमिट होतात आणि त्यानंतर तिथे अनेक महिने आराम करतात. त्यासाठी त्याना जेलमधील, तुरुंगातील ही डॉक्टर सर्व मदत करतात. ससूनमध्ये सध्या अशा अनेक गुंडांचा उपचाराच्या नावाखाली मुक्काम आहे. यात पुण्याचा कुख्यात माफिया गजा मारणे याच्या पुतण्यासह अनेकांचा समावेश आहे. सरकारला किंवा पोलिसांना हे ठाऊक नाही असे नाही. पण पैशाने सगळ्यांची तोंड बंद करण्यात आली आहेत. गुंडांना अशा तऱ्हेने तुरुंगाऐवजी सरकारी रुग्णालयांमध्ये आराम करण्याची संधी उपलब्ध करून देणे भयंकर आहे. या गुंडाकडून आपली कामे करून घेण्यासाठी राजकीय पुढारी अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. त्याचा परिणाम रुग्णालयांच्या आरोग्य सेवेवर तसेच सुरक्षेवर होतो. ड्रग माफिया ललित पाटील ससूनमध्ये कित्येक महिने उपचार घेतोय, त्याला असा कोणता रोग आहे की ज्यामुळे त्याला इतके महिने रुग्णालयात रहावे लागले. बर तो आजारी असेल तर रुग्णालयातून पळाला कसा? याचे उत्तर मिळायला हवे. ललित पाटील रुग्णालयात उपचार घेत असताना त्याच्या दोन्ही प्रेयसी त्याला रुग्णालयात भेटायला यायच्या. त्यानंतर त्यांना घेऊन तो हॉटेलमध्ये जायचा आणि मौज मजा करायचा. कधी कधी तर रुग्णालयातच त्याला अय्याशीसाठी रूम उपलब्ध करून दिली जायची असे बोलले जाते. मग हे सर्व जर खुलेआम ससून रुग्णालयात होत असेल, तर ससूनला रुग्णालय का म्हणायचे? सामान्य माणूस रुग्णालयाच्या वेळेत जर ॲडमिट असलेल्या आपल्या रुग्ण नातेवाईकाला भेटायला गेला, तर भेटीची वेळ संपल्यानंतर त्याला एक मिनिट सुद्धा तिथे थांबू दिले जात नाही. पण ससुनमध्ये जे गुंड अडमीट आहेत, त्यांच्या टोळीतील लोक वाटेल तेंव्हा, वाटेल तितका वेळ ॲडमिट असलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांना भेटू शकतात. याचा अर्थ काय? हे महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी एकदा जनतेला सांगावे. त्यामुळे गुंडांना रुग्णालयात आश्रय मिळण्याच्या प्रकारची न्यायालयीन चौकशी व्हायला हवी. मात्र ललित पाटील पलायन प्रकरणानंतर सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप करीत आहेत. ललित पाटील कुठल्या पक्षाचा आहे, या पेक्षा जेलमधून त्याला ससूनमध्ये कुठल्या आजारासाठी पाठवण्यात आले? त्यासाठी जेलमधील कुठल्या डॉक्टरांनी लालितला ससूनमध्ये ॲडमिट करण्याची शिफारस केली? त्यानंतर ससूनमध्ये ललित पाटील याच्यावर कोणत्या डॉक्टरांकडून कोणते उपचार सुरू होते? याची सुद्धा चौकशी व्हायला हवी. कारण हे एक मोठे रॅकेट आहे आणि यात तुरुंगातील व हॉस्पिटल मधील डॉक्टर सामील आहेत. ससून रुग्णालयामध्ये काही गुंड् ॲडमिट असल्याने तिथला जो महिला स्टाफ आहे त्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे. कारण ॲडमिट असलेल्या या गुंडांची तिथल्या महिला डॉक्टर, नर्सेस यांच्यावर वाईट नजर असते. अशीही चर्चा आहे की काही गुंडाने पैशाचे आमिष दाखवून किंवा धाकट दपशा दाखवून महिलांचे शोषण केले आहे. केवळ ससून मध्येच नाही, तर महाराष्ट्रातील ज्या सरकारी रुग्णालयात माफिया गुंड ॲडमिट आहेत तिथे असेच काही भयंकर प्रकार घडले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारी रुग्णालयात ॲडमिट असलेल्या गुंडांच्या आजारपणाचा आणि त्यांच्यावर सुरू असलेल्या उपचारांचा सर्व तपशील सरकारने मागवावा आणि चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी. वैद्यकीय सेवेला साक्षात ईश्वर सेवा समजले जाते. त्यामुळे गोरगरीब माणूस मोठ्या विश्वासाने सरकारी रुग्णालयात उपचारासाठी जातो. पण सरकारी रुग्णालयांचा आजवरचा इतिहास काही चांगला नाही. आजारी माणसांशी तिथले डॉक्टर असोत कि अन्य कर्मचारी चांगले वागत नाहीत. आजार गंभीर असला तरी ॲडमिट असलेल्या रुग्णाला जास्त दिवस ठेवले जात नाही, पण आज काल तुरुंगातून तिथल्या डॉक्टरांच्या शिफारसीवरून आलेल्या माफियांना मात्र ते राहतील तितके दिवस रुग्णालयात ठेवले जाते त्यांना सर्व सेवा सुविधा दिल्या जातात. ॲडमिट असलेला गुंड कधीही थोड्या वेळासाठी बाहेर जाऊन मौजमजा करून किंवा एखाद्याची मर्डर करून येऊ शकतो, त्याला रुग्णालयातील सुरक्षा रक्षक विचारात नाहीत. याचा अर्थ रुग्णालये आता गुंडांचे सुरक्षित अड्डे बनले आहेत. ॲडमिट असलेल्यांना भेटायला येणाऱ्या गुंडांकडून रुग्णालयाच्या सुरक्षेला कधीही धोका होऊ शकतो, तेंव्हा या सर्व प्रकरणाची चौकशी व्हायला हवी!

# राज्यात बंदरे क्षेत्रात झपाट्याने विकास, गुंतवणूकदारांचे स्वागत -मुख्यमंत्री शिंदे

## तिसऱ्या ग्लोबल मेरीटाइम इंडिया समिट (GMIS) २०२३चे उद्घाटन



**मुंबई/प्रतिनिधी**

जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेकडे भारताची वाटचाल सुरू आहे. सागरी व्यापाराचा यात मोठा वाटा असणार आहे. बंदरे, जहाजबांधणी क्षेत्रातील जागतिक गुंतवणूकदारासाठी भारतात गुंतवणूक करण्याची मोठी संधी आहे. येत्या काळात सागरी व्यापार क्षेत्रातही आघाडीचा देश म्हणून भारताचे नाव घेतले जाईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. प्रधानमंत्र्याच्या हस्ते विविध उपक्रमांचे दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे भूमीपूजन करण्यात आले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे तिसऱ्या ग्लोबल मेरीटाइम इंडिया समोर (GMIS) २०२३ चे उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. मुंबईतील एमएमआरडीए मैदानावर आजपासून सुरु झालेली ही परिषद १९ ऑक्टोबरपर्यत सुरू राहणार आहे. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय बंदर व जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, 'फिक्की'चे अध्यक्ष सुभ्रकांत पांडा तसेच विविध देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी राज्याचे बंदरे मंत्री संजय बनसोडे आणि शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची उपस्थिती होती.

### २३ हजार कोटींपेक्षा जास्तीचे प्रकल्प

या सोहळ्यात प्रधानमंत्री श्री.मोदी यांच्या हस्ते भारतीय सागरी नील अर्थव्यवस्थेसाठीच्या दीर्घकालीन ब्लू प्रिंटचे अर्थात अमृत काल व्हीजन २०४७' चे अनावरण करण्यात आले. या ब्लू प्रिंटमध्ये बंदरांमधील सेवासुविधा वाढवण्यासह, शाश्वत पद्धतींना चालना आणि आंतरराष्ट्रीय सहयोग वृद्धी याविषयी विविध धोरणात्मक उपाययोजनांचा समावेश आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते २३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांची मुहूर्तमेढ करण्यात आली. यात गुजरातमधील दीनदयाल बंदर प्राधिकरण येथे ४ हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या टुना टेक्रा ऑल-वेदर डीप ड्राफ्ट टर्मिनलच्या कोनशिलेचे अनावरण देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सागरी क्षेत्रात जागतिक आणि राष्ट्रीय भागिदारीसंदर्भात झालेले ७ लाख कोटींहून अधिक किंमतीचे ३०० हून अधिक सामंजस्य करार देखील करण्यात आले.

यावेळी प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, कोविडनंतर सगळे जग बदलले. भारताकडे जग वेगळ्या अपेक्षेने बघत आहेत. लवकरच भारत जगातील पहिल्या तीन अर्थव्यवस्था पैकी एक असेल. सागरी व्यापाराचा मोठा वाटा अर्थव्यवस्थेत आहे. ही परिषद त्यादृष्टीने महत्वाची आहे. मागील ९ वर्षापासून सागरी धोरण सशक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. ते म्हणाले की, गेल्या ९ वर्षात लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्स खूप सुधारला आहे. आयएनएस विक्रांत देशाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. लवकरच जहाज बांधणीत आपण देशाला आघाडीवर घेऊन जाऊ यात शंका नाही. आपण मेक इन इंडियावर भर दिला आहे. येणाऱ्या काळात देशात विविध ठिकाणी जहाज बांधणी आणि दुरुस्ती सुरू करीत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

भारताकडे विशाल सागरी किनारा, मजबूत इको सिस्टिम, सांस्कृतिक वारसा आहे. जगातली सगळ्यात मोठी रिव्हर क्रूझ सर्व्हिस आपण सुरू केली आहे. मुंबईत सुद्धा आधुनिक, असे क्रूझ टर्मिनल सुरू करीत आहोत. भारताकडे डेव्हलपमेंट, डेमोग्राफी, डेमॉक्रॅसी, डिमांड या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. त्यामुळे या क्षेत्रात आघाडीचा देश बनण्याची पूर्ण क्षमता भारताची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशातील वारसा जपण्याचे काम आपण करत आहोत. त्यादृष्टीने लोथल डॉकयार्ड येथे राष्ट्रीय मेरीटाइम कॉम्प्लेक्स बनवले जाईल, अशी घोषणा यावेळी प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी केली. राज्यपाल श्री. बैस म्हणाले की, महाराष्ट्राला सागरी इतिहास आहे. मुंबई हे आर्थिक केंद्र होण्यामध्ये येथील सागरी व्यापाराचा मोठा वाटा आहे. अर्थव्यवस्थेत बंदरे आणि जहाजबांधणी क्षेत्राचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षा या घटकांकडे लक्ष देत सहभागी राष्ट्रांनी व्यापारी आदानप्रदान वाढविण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

### बंदरे विकासाला वेग

मुख्यमंत्री श्री. शिंदे आपल्या भाषणात म्हणाले की, आगामी काळात बंदरांवर हायड्रोजन हबची स्थापना, एलएनजी बंकरिंग, यासारख्या सुविधांमुळे राज्यातील बंदरे विकास एका उंचीवर जाईल. रेल्वे, समुद्र आणि जलमार्ग यांना एकत्रित करणारी मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी विकसित करण्यावर आमचे लक्ष आहे. पीएम गति शक्ती योजनेत लॉजिस्टिक कार्यक्षमता आणि कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.

### मालवाहतूक, प्रवासी वाहतुकीत वाढ

मुख्यमंत्री म्हणाले की, राज्याला लाभलेला ७२० किलोमीटरचा समुद्र किनारा, २ प्रमुख बंदरे, १४ पेक्षा जास्त मोठी आणि मध्यवर्ती बंदरे आणि असंख्य खाड्या या सर्व गोष्टी भारताच्या सागरी व्यापार वाढीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात. २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रात मालवाहतुकीच्या प्रमाणात उल्लेखनीय वाढ झाली असून प्रवासी वाहतूक सेवेसाठी नवीन मार्ग सुरू केले आहेत. जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी भारतातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बंदरांपैकी आणि टॉप ३० जागतिक बंदरांपैकी एक असून मुंबई पोर्ट थॉरिटी जगभरातील सर्वोत्तम परंतु सर्वात कमी क्रूझ टॅरिफ देते.

### पुढील वर्षी आंतरराष्ट्रीय क्रूझ टर्मिनल

२०२४ मध्ये महाराष्ट्र मुंबईतील आंतरराष्ट्रीय क्रूझ टर्मिनल सुरु होतेय, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, याठिकाणी वर्षाला २०० क्रूझ जहाजे आणि १ दशलक्ष प्रवासी हाताळण्याची क्षमता असेल. महाराष्ट्र विकासात नेहमीच अग्रेसर राहिला आहे. खासगी बंदरांसाठी रस्ते आणि रेल्वे पायाभूत सुविधा विकसित करण्याव्यतिरिक्त, आमचे सागरी धोरण सागरी पर्यटन, जहाज बांधणी, दुरुस्ती आणि पुनर्वापर उद्योगांना महत्त्वपूर्ण चालना देईल, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळे जागतिक सागरी क्षेत्रात भारताचे स्थान उंचावले आहे. यावेळी मुंबई पोर्ट ट्रस्टला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्धल एका टपाल तिकिटाचे आणि प्रोपेलिंग इंडियास मेरिटाइम व्हिजन (Propelling India's Maritime vision) या पुस्तकाचे राज्यपाल श्री. बैस, मुख्यमंत्री व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. केंद्रीय बंदरे सचिव टी. के. रामचंद्रन यांनी प्रास्ताविक केले. फिक्की'चे अध्यक्ष श्री. पांडा तसेच उपस्थित विविध देशांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून श्रीलंकेचे बंदरे व जहाज मंत्री निर्मल डिसिल्वा यांनी मनोगत व्यक्त केले. मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष राजीव जलोटा यांनी आभार मानले. आजच्या या शिखर परिषदेत युरोप, आफ्रिका, दक्षिण अमेरिका, आशिया (मध्य आशिया, मध्य पूर्व आणि बिमस्टेक क्षेत्रासह) अशा जगभरातील विविध देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंत्र्यांचा सहभाग आहे. या शिखर परिषदेला जगभरातील उद्योगांचे प्रमुख कार्यकारी अधिकारी, व्यावसायिक नेते, गुंतवणूकदार, आणि इतर भागधारक देखील उपस्थित आहेत. याशिवाय, देशातील विविध राज्यांचे मंत्री आणि इतर मान्यवर या शिखर परिषदेत आपापल्या राज्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित आहेत. यावेळी कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी प्रदर्शनाच्या ठिकाणी 'महाराष्ट्र पॅव्हेलियन'ला भेट दिली. याठिकाणी एमआयडीसी, एमएसआरडीसी, महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या दालनाला भेट दिली.

# कर्ज योजनेच्या माध्यमातून इतर मागासवर्गीय उद्योजकांना सुवर्णसंधी

राज्यातील ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवार दि. १९ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता ऑनलाईन पध्दतीने उद्घाटन होणार आहे. राज्यातील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी तसेच ग्रामिण भागातील विकासाला चालना देण्याचा उद्देश ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचा आहे. कोकणातील ग्रामीण क्षेत्रामध्ये इतर मागासवर्गीय समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्यासाठी शामराव पेजे कोंकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ विविध योजनेच्या माध्यमातून तरुण पिढीला स्वयंरोजगारासाठी कर्ज स्वरुपात सहाय्य देत आहे. राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने या महामंडळाची स्थापना केली आहे. समाजातील इतर मागासवर्गीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. छोटे व्यावसायिक व स्वयंरोजगाराकरीता रु.१ लक्ष ची थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थीना व्याज नाही) व २०% बीज भांडवल योजना. तसेच ऑनलाईन योजनांमध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० लक्ष पर्यत), गट कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० लक्ष ते ५० लक्ष पर्यत) या योजनांचा समावेश आहे. सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरीता विविध कर्ज योजनांचे पालघर जिल्हा कार्यालयास उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. थेट कर्ज योजना व २०% बीज भांडवल योजना या योजनांचे अर्ज जिल्हा कार्यालयात सशुल्क उपलब्ध आहेत. रु. १

**लक्ष थेटकर्ज योजना :** सिबील क्रेडीट स्कोर किमान ५०० असलेल्या लाभार्थीना सदर कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परतफेडीचा कालावधी ४ वर्ष आहे. अर्जदाराच्या वयाची मर्यादा १८ ते ५५ वर्षे आहे. कर्जाची नियमित परतफेड करणा-या लाभार्थीना व्याज आकारण्यात येणार नाही. मासिक हप्ता रु. २०८५/-. २०% बीज भांडवल योजना : कर्जाची उच्चतम मर्यादा रु. ५ लक्ष पर्यत कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे आहे. अर्जदाराच्या वयाची मर्यादा १८ ते ५० वर्षे आहे. बँकेमार्फत लाभार्थीना ७५% कर्ज उपलब्ध केले जाते. यामध्ये लाभार्थीचा सहभाग ५% महामंडळाचा सहभाग २०%, बँकेचा सहभाग ७५% महामंडळाच्या कर्ज रक्कमेवर व्याजाचा दर ६% असतो.

**या योजनांसाठी लागणारी सर्वसाधारण कागदपत्रे :** पासपोर्ट साईज २ फोटो, तहसिलदार/नायब तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मुळ दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. १ लक्ष), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (इ.मा.व.), दरपत्रक (कोटेशन), प्रकल्प अहवाल, आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा निवडणुक ओळखपत्र व शिधा पत्रिकेची झेरॉक्स, सिबील क्रेडीट रिपोर्ट- थेट कर्ज योजनेकरीता (स्कोर किमान ५० असावा), स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत/नगरपालिका) व्यवसाय करण्याबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र, डोमिसाईल किंवा रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र / जन्मतारखेचा दाखला. भाडेकरार किंवा संबंधित जागा मालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा असेसमेंट उतारा इ. कागदपत्रे आवश्यक आहेत.वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना या योजनांकरीता महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळाला भेट देवून ऑनलाइन अर्ज दाखल करता येईल.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. १0 लक्ष पर्यत)** : सदर योजना संपुर्णपणे संगणीकृत आहे. या योजनेमध्ये बँकेने रु.१० लाखापर्यतच्या मर्यादेत कर्ज मंजुर केलेल्या अर्जदाराने कर्जाचे हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम (१२ टक्के मर्यादेत) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. सदर योजनेचा कालावधी ५ वर्ष असेल. सदर योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० असावे, अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८. लक्ष पर्यत. आहे.(सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार), कुटूंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराचे आधार संलग्न बँक खाते असणे अनिवार्य असून महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र (ङर्शीींशी ष खपींशपीं) दिले जाईल. अर्जदारास या आधारे बँकेकडुन कर्ज मंजुर करुन घ्यावे लागेल.

**गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.१0 लक्ष ते ५0 लक्ष पर्यत) :** इतर मागासवर्गीय प्रवर्गातील महामंडळाच्या निकषांनुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवारांच्या बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत), LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थाना बँकेमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरीता जे कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडुन अदा केला जाईल. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८ लक्ष पर्यत असलेल्या उमेदवारांच्या गटास बँकेकडुन रु. १० लक्ष ते रु.५० लाख पर्यत मंजुर उद्योग उभारणीकरीता कर्ज उपलब्ध केले जाईल. गटातील सदस्यांचे वय १८ ते ४५ पर्यत असावे. गटातील सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडीट स्कोअर किमान ५०० इतका असवा. परत फेडीचा कालावधी मंजुर कर्जावर ५ वर्षापर्यत अथवा कर्ज कालावधी यापैकी जो कमी असेल, तो कर्ज मंजुर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर (जास्तीत जास्त १२ टक्के व्याज दराच्या आणि रु.१५ लाखाच्या मर्यादेत) त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बैंक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलद्वारे गटाचा ऑनलाईन पध्दतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जाईल. गटास या आधारे बँकेकडुन कर्ज मंजुर करून घ्यावे लागेल. तरी इच्छुक, गरजु इ.मा.व. (ओ.बी.सी.) प्रवर्गातील व्यक्तींनी योजनांच्या अधिक माहितीकरीता शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ लि.चे जिल्हा कार्यालय : आफीन अपार्टमेंट, बी विंग, सदनिका नं. १०६, पहिला मजला, नवली रेल्वे फाटक रोड, नवली, पालघर पूर्व), जिल्हा पालघर, पिन कोड ४०१४०४ दुरध्वनी क्रमांक : ९८६९२८१७८७ /९२०९६३१७२२ वा Email-dmobcpalghargmail.com येथे संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी www.msobcfdc.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**- राहुल भालेराव, जिल्हा माहिती अधिकारी, पालघर**

# विशेष मतदार नोंदणी शिबिरात २२३ दिव्यांग मतदारांची नोंदणी

**लातूर/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयामध्ये १३ ऑक्टोबर रोजी दिव्यांग बांधवांसाठी आयोजित विशेष मतदार नोंदणी शिबिरात २२३ दिव्यांग मतदारांनी आपली नोंदणी केली. तसेच या दिवशी मतदार यादीतील १ हजार ६९९ दिव्यांग मतदारांचे फ्लॅगिंग करण्यात आले. भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या सूचनेनुसार १ जानेवारी २०२४ या दिनांकावर आधारित मतदार याद्यांचे संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादीत दिव्यांग व्यक्तीची मतदार यादीत नोंदणी करणे, फ्लॅगिंग करण्याच्या सूचना आयोगाने दिलेल्या आहेत. त्यानुसार लातूर जिल्ह्यात ऑक्टोंबर महिन्यातील प्रत्येक आठवड्यात विशेष मतदार नोंदणीचे आयोजन करण्यात येत आहे. १३ ऑक्टोबर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी संपूर्ण जिल्ह्यामध्ये दिव्यांग मतदारांची नोंदणीसाठी शिबीर राबविण्याच्या सूचना दिल्या होत्या.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या सोमवार दि. २३ ऑक्टोबर २०२३ ते रविवार दि. २९ ऑक्टोबर २०२३ लातूर/पालघर/सोलापूर www.crimesandhya.com ५

## प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे पंतप्रधानाच्या हस्ते उद्घाटन

# कौशल्य विकास प्रशिक्षणातून भारतीय युवकांच्या जीवनात नवी पहाट -पंतप्रधान नरेंद्र मोदी

**मुंबई/प्रतिनिधी**

कौशल्य विकास प्रशिक्षण हा भारतातील युवकांच्या जीवनात नवी पहाट आणेल. विकसित भारत घडवण्यात या प्रशिक्षणाची महत्वपूर्ण भूमिका राहील. त्या दृष्टीने महाराष्ट्राची प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांची योजना महत्वपूर्ण आहे, असे कौतुकोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. तर ही कौशल्य विकास केंद्र राज्यासाठी रोजगार मंदिरे ठरतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने राज्यातील ३५० तालुक्यांत स्थापन करण्यात आलेल्या ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दृकश्राव्य संवाद (ऑनलाईन) प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी सह्याद्री राज्य अतिथीगृह येथील समारंभास मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक आदी व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच राज्यभरातील ग्रामीण भागातील या कौशल्य विकास केंद्रांच्या ठिकाणी त्या-त्या परिसरातील लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत महसूल विभागातील विभागीय महसूल अधिकारी, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, केंद्रांचे समन्वयक तसेच प्रशिक्षणार्थी उमेदवार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही केंद्र दृकश्राव्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून मुख्य समारंभास जोडण्यात आली होती. नवरात्रीचे पवित्र पर्व सुरु असल्याचा उल्लेख करत आणि त्यानिमित्ताने शुभेच्छा देतानाच पंतप्रधान श्री. मोदी म्हणाले, आईला आपल्या मुलाच्या सुख आणि यशाची काळजी असते. अशा या पवित्र काळात आपण युवकांसाठी प्रशिक्षण आणि संधीच्या दृष्टीने आगळी संकल्पना सुरु करत आहोत. या प्रशिक्षणामुळे युवकांच्या जीवनात नवी पहाट उदयास येईल. कारण जगभरात भारतातील प्रशिक्षित तरुणांना मागणी आहे. अन्य देशांमध्ये ज्येष्ठांची संख्या वाढते आहे. एका सर्व्हेक्षणानुसार जगभरातील १६ देशांमध्ये ४० लाख प्रशिक्षित युवकांची गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा युवकांना या देशांमध्ये बांधकाम, आरोग्य, पर्यटन, आदरातिथ्य, शिक्षण आणि परिवहन अशा क्षेत्रात मोठी मागणी आहे. अशा कौशल्य विकास प्रशिक्षणातून आपण केवळ भारतासाठी नाहीतर, अशा देशांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करू शकतो, असेही त्यांनी सांगितले. बांधकाम, आधुनिक शेती तसेच मनोरंजन - माध्यम क्षेत्रातील प्रशिक्षणाच्या संधीचा उल्लेख करून पंतप्रधान श्री. मोदी म्हणाले, महाराष्ट्रातील या कौशल्य विकास केंद्रांतून विदेशात संधी आजमावू शकणाऱ्या तरुणांना काही सॉफ्ट स्किलचे प्रशिक्षण देणेही उचित ठरेल. गत काळात कौशल्य विकास हा विषयच गांभीर्याने घेतला गेला नव्हता. त्यामुळे क्षमता आणि संधी असूनही युवकांना प्रशिक्षणाअभावी नुकसानच सहन करावे लागले. आता मात्र आपण कौशल्य विकासासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना केली आहे. त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद केली आहे. कोट्यवधी तरुणांना पंतप्रधान कौशल्य विकास केंद्रांच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जात आहे. आजही ग्रामीण भागात कित्येक कारागिर कुटुंबात पारंपरिक





ज्ञानाचा पुढे वारसा सोपवला जातो. त्यांना पाठबळाची, आधाराची गरज असते. त्यादृष्टीने आपण विश्वकर्मा श्रम सन्मान योजना राबवू लागलो आहोत. त्यांना आधुनिक उपकरणे आणि चांगले प्रशिक्षण दिले जात आहे. महाराष्ट्रातील ही ५११ केंद्र या विश्वकर्मा योजनेला पुढे नेण्यासाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वासही पंतप्रधानांनी व्यक्त केला. यावेळी भाषणात पंतप्रधान श्री. मोदी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या औद्योगिकरणाबाबतच्या विचारांचाही तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक बंधनांना झुगारून स्त्री शिक्षणासाठी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले की, कौशल्य विकास आणि अशा प्रक्षिणातूनच दलित, वंचित आणि मागास घटकांना अधिक प्रतिष्ठापुर्वक, सन्मानाने जगण्याची संधी मिळते. त्यामुळे याच घटकांना या कौशल्य विकास कार्यक्रमाचा लाभ होणार आहे. आता ड्रोनद्वारेही आधुनिक शेती करता येता. यात आपल्या महिला भगिनींनाही संधी आहे. त्यांनाही या क्षेत्रातील प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्र, इंडस्ट्री फोर् प्वाईंट ओ, सेवा क्षेत्र, नैसर्गिक शेती, कृषी औद्योगिक आणि या क्षेत्रातील मुल्यवर्धन साखळी, पॅकेजिंग अशा क्षेंत्रातील संधीचाही पंतप्रधान श्री. मोदी यांनी उल्लेख करून या क्षेत्रातील प्रशिक्षण युवकांसाठी नव्या संधीचे दरवाजे खुले करतील असा विश्वास व्यक्त केला.

**कौशल्य विकास केंद्र राज्यातील रोजगार मंदिरे - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

देशातील ऊर्जावान युवाशक्तीची क्षमता केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले की, युवा शक्ती मोठे संसाधन आहे, हे ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्किल इंडिया मिशन सुरू केले होते. गेल्या सहा वर्षात बेरोजगारीचे प्रमाण घटले आहे. देशात गत नऊ वर्षात पाच हजार नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र - आयटीआय सुरु करण्यात आली. यातून चार लाख उमेदवारांना प्रशिक्षण मिळणार आहे. पीएम विश्वकर्मा ही क्रांतिकारी योजना सुरू करून पारंपरिक कौशल्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली आहे. आपण राज्याच्या अर्थसंकल्पात देखील ग्रामीण भागाकडून शहराकडे होणारे स्थलांतराचे प्रमाण कमी व्हावे यासाठी ग्रामीण भागात अशी केंद्रे सुरु करण्याचा मानस व्यक्त केला होता. त्यानुसार यासाठी युद्ध पातळीवर प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्रांचा आराखडा तयार केला. प्रत्येक केंद्रातून १०० उमेदवार असे प्रत्येक वर्षी सुमारे ५० हजार कुशल उमेदवार तयार होतील. आपण बेरोजगारांची फौज असे नेहमी म्हणतो... पण ही आमची कुशल फौज असणार आहे. जे उद्याच्या महाराष्ट्रात सन्मानानं नोकरी व्यवसाय करीत असतील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्याच्या तळागाळात, ग्रामीण भागात, खेड्यातल्या युवकांचा कौशल्य विकास होईल. यात ३० टक्के महिला असतील. ग्रामीण भागातील कारागीरांना सुद्धा आणखी चांगले प्रशिक्षण मिळेल. आपण आयटीआयच्या प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन वाढवून ५०० रुपये इतके केले आहे. बारावीनंतर १५ हजार उमेदवारांच्या रोजगार व शिक्षण-प्रशिक्षणासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस सोबत करार केला आहे. स्टार्ट अप्सना विविध पुरस्कार देऊन प्रोत्साहन दिले आहे. राज्यातील आयटीआयमध्ये ७५ व्हर्चुअल क्लासरुम्स सुरु केले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात बारा हजाराहून अधिक नवीन उद्योग व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्यांना कर्ज दिल्याचे उल्लेख करून, ही प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र राज्यातील रोजगार मंदिरे बनतील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. प्रमोद महाजन यांच्याकडे आधुनिकतेची दूरदृष्टी होती याचा उल्लेख करून मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्यात २९० रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले होते. त्याद्वारे १ लाख ४० हजार तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिल्याचेही त्यांनी सांगितले. यापुढेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे बलशाली भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी कार्यरत राहील, असेही ते म्हणाले.

**पंतप्रधानाचे कुशल भारताचे स्वप्न साकार करू - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भारत महाशक्ती होण्यासाठी बदलत्या काळाची गरज ओळखून ग्रामीण भागातदेखील कौशल्य विकासाचे शिक्षण दिले जाणे गरजेचे आहे. प्रधानमंत्री यांनी कौशल्य विकासाचे जे काम सुरू केले आहे त्याचे चांगले परिणाम संपूर्ण भारतभर दिसत आहेत. मा. पंतप्रधान यांच्या दूरदृष्टीने ही गरज ओळखून देशात कौशल्य विकास अभियान सुरू झाले आहे. विश्वकर्मा योजना की त्याचाच पुढील टप्पा आहे. भारत ही जगातील सर्वात मोठी पाचवी अर्थव्यवस्था म्हणून नावारूपाला आलेली आहे आणि त्यातूनही अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. आपला देश अशाच प्रकारे प्रगती करत राहिला तर जगातील मोठी तिसरी अर्थव्यवस्था म्हणून लवकरच आपण झेप घेवू.५११ प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्र सुरू झाली आहेत. इथेच आपण थांबणार नसून राज्यात आगामी काळात ही संख्या नक्कीच वाढवून पाच हजार पर्यत नेवू. पंतप्रधानाचे कुशल भारताचे स्वप्न साकार करू, असे ही उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.

**कौशल्य विकास केंद्रांमुळे ग्रामीण महाराष्ट्रात रोजगार क्रांती - उपमुख्यमंत्री अजित पवार**

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, राज्यात सुरू झालेली प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र ही राज्याच्या विकासाला चालना देणारी ठरतील. ग्रामीण भागातील ही कौशल्य विकास केंद्र ग्रामीण रोजगारामध्ये क्रांती घडवून आणतील. या केंद्रामध्ये आधुनिक युगाला आवश्यक असलेले प्रशिक्षण दिले जाणार आहे अत्यंत गोष्ट आहे. या केंद्राच्या माध्यमातून राज्य आणि देशाच्या विकासाला चालना देणारी ठरेल. पी.एम.विश्वकर्मा योजना ही राज्यातील ग्रामीण कारागिरांना आपल्या विकासासाठी उपयुक्त ठरत आहे.देशाला महासत्ता बनवण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांना महाराष्ट्र राज्य आपल्याला सदैव आपल्या पाठीशी आहे असेही उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**केंद्र युवकांसाठी उज्वल भविष्याचे प्रवेशद्वार - मंत्री लोढा**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्किल इंडियाला प्राधान्य दिले असून हीच बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य देखील राज्यातील प्रत्येक गावागावात कौशल्यपूर्ण प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील आहे. राज्यामध्ये जी ५११ प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्र होणार आहेत त्यामध्ये ग्रामीण भागाला पूरक असणाऱ्या व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जाईल त्याचबरोबर जागतिक स्तरावर लागणाऱ्या योग्यतेचे प्रशिक्षण देखील दिले जाईल. गावातून कोणत्याही व्यक्तीला रोजगारासाठी शहराकडे येण्याची गरज यामुळे भासणार नाही अशा प्रकारे नव्याने उभारलेली कौशल्य विकास केंद्रे राज्याच्या विकासासाठी आणि गावांना सक्षम करण्यासाठी निश्चितच उपयोगी ठरतील असेही मंत्री लोढा म्हणाले. सुरवातीला भगवान विश्वकर्मा, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. पंतप्रधान श्री. मोदी यांच्या हस्ते कळ दाबून प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले. मुख्य सचिव श्री. सौनिक यांनी सूत्रसंचालन केले. कौशल्य विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह यांनी आभार मानले.

**प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राविषयी**

कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र असे ब्रीद घेऊन राज्यातील ३५० तालुक्यांमधील ५११ ग्रामपंचायतींच्या ठिकाणी पहिल्या टप्प्यात ५११ केंद्र. ग्रामीण भागातील तरुणांना रोजगार व उद्योजकता प्रशिक्षण मिळणार. कृषिपूरक पारंपरिक व व्यावसायिक कौशल्य क्षेत्रातील प्रशिक्षण. पी.एम. विश्वकर्मा योजनेसाठी ही विकास केंद्र उपयुक्त ठरणार. या केंद्रामध्ये एकावेळेस जास्तीत जास्त २ जॉब-रोल्सचे प्रशिक्षण प्रदान करण्यात येईल. अल्प कालावधीत (साधारणत: ३ महिने) पूर्ण होवू शकणारे (किमान २०० व कमाल ६०० तास प्रशिक्षणाचा कालावधी) अभ्यासक्रमाची निवड जिल्हा, कौशल्य, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्यामार्फत करण्यात येईल. प्रत्येक प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रात वर्ष २०२३-२४ करिता एकूण १०० उमेदवारांचे प्रशिक्षणाचे उद्दिष्ट देण्यात येईल. प्रत्येक प्रशिक्षण केंद्रामध्ये किमान ३०% महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल. या केंद्रातून दरवर्षी सुमारे ५० हजार युवक-युवतीं कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे रोजगारक्षम होतील.

# कोकण विभागात ५४ कौशल्य विकास केंद्र कार्यान्वीत

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या लोकार्पण प्रसंगी कोंकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी पनवेल केंद्रावर उपस्थित राहून दृक श्राव्य प्रणालीव्दारे या कार्यक्रमात सहभाग घेतला. तरुणांच्या रोजगार संधीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणाऱ्या प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचा आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दृक श्राव्य प्रणालीच्या माध्यमातून शुभारंभ झाला. राज्यातील ५११ ग्रामपंचायतीमधील ही केंद्रे एकाच वेळी सुरू करण्यात आली असून, त्यापैकी कोकण विभागात ५४ केंद्र आज सुरू करण्यात आली. यावेळी सह्याद्री अतिथीगृह येथून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव मनोज सौनिक हे दृक श्राव्य प्रणाली माध्यमाद्वारे उपस्थित होते. पनवेल केंद्र येथून आमदार प्रशांत ठाकूर, उप आयुक्त (विकास) गिरीश भालेराव, उप

### विभागीय आयुक्तांची पनवेल येथे उपस्थित उपस्थिती




आयुक्त कौशल्य विकास डी.डी.पवार, उप आयुक्त पनवेल महानगरपालिका कैलाश गावडे, प्रगती स्किल डेव्हलपमेंटचे संचालक चव्हाण तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्रातील २८ हजार ग्रामपंचायतींमध्ये आजवर एकही कौशल्य विकास केंद्र नव्हते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार ही कौशल्य विकास केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला. रोजगारासाठी तरुणांचे गावातून शहरात स्थलांतर होऊ नये या दृष्टीने कौशल्य विकास केंद्राची ही संकल्पना महत्त्वाची असून, भविष्यात राज्यातील या केंद्रांची संख्याही वाढवण्यात येणार आहे. ही केंद्र ३४ जिल्ह्यांच्या ग्रामीण भागांमध्ये स्थापन करण्यात आली आहेत. कोकण विभागातील ठाणे जिल्ह्यात ९, पालघर जिल्ह्यात १२, रायगड जिल्ह्यात १४, रत्नागिरी जिल्ह्यात ११, तर सिंधुदूर्ग जिल्ह्यात ८ अशा एकूण ५४ कौशल्य विकास केंद्रांचे एकाच वेळी दृक श्राव्य प्रणालीद्वारे उद्घाटन झाले. कोकण विभागात विविध ठिकाणी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या लोकार्पणाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडणात आला. ठाणे येथे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्य उपस्थितीत कोन ग्रामपंचायत येथे कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हाधिकारी ठाणे अशोक शिनगारे उपस्थित होते. रायगड जिल्हाधिकारी डॉ योगेश म्हसे यांनी चेंढरे ग्रामपंचायत केंद्र येथून कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला. यावेळी त्या ठिकाणी १५०० युवक, युवती, विद्यार्थी उपस्थित होते. पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके हे उमरोळी येथील ग्रामपंचायत येथून कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

पालघर जिल्ह्यात १२ ठिकाणी कार्यक्रम संपन्न झाला. रत्नागिरी जिल्हयात जिल्हाधिकारी एम देवेंद्र सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ११ ठिकाणी कौशल्य विकास केंद्राच्या लोकापर्ण कार्यक्रम संपन्न झाला. कोकण विभागातील कौशल्य विकास कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा कौशल्य अधिकारी आणि अन्य विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# पालघर जिल्ह्यातील १२ केंद्रांचा समावेश

### उमरोळी येथे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांची उपस्थिती



**पालघर/प्रतिनिधी**

राज्यातील ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संपन्न झाले. पालघर जिल्ह्यातील १२ केंद्रांचा यामध्ये समावेश आहे. १२ केंद्रामध्ये स्थानिकांना दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी जिल्हा प्रशासना मार्फत सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. उमरोळी येथिल ग्रामपंचायतीच्या सभागृहामध्ये जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी उपस्थित राहून तरुनांना प्रेरणा दिली. दूरदृश्य प्रणाली व्दारे सह्याद्री राज्य अतिथीगृह येथील समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक आदी व्यासपीठावर उपस्थित होते. पालघर तालुक्यातील उमरोळी येथे तहसिलदार रमेश शेंगडे, शासकीय अधिकारी, ग्रामपंचायतीचे कर्मचारी, आशा कार्यकर्ता, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच स्थानिक युवक उपस्थित होते. राज्यातील ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांमध्ये पालघर जिल्ह्यातील १२ केंद्रांचा समावेश करण्यात आला आहे. समावेश करण्यात आलेले केंद्र पुढीलप्रमाणे - पालघर तालुक्यातील उमरोळी, बोईसर, सफाळे, डहाणू तालुक्यामध्ये वाळवीपाडा, कासा, कोसबाड, वाडा तालुक्यातील पाली, विक्रमगड तालुक्यामध्ये साखरे, तलवाडा, तलासरी तालुक्यामध्ये उधवा, मोखाडा तालुक्यातील असे, वसई तालुक्यातील अर्नाळा तसेच जव्हार तालुक्यातील वळवंडा या गावांचा समावेश करण्यात आला आहे.

## 'मेरी माटी मेरा देश' अभियानात सहभागी होणार आश्रमशाळेतील विद्यार्थी - डॉ.विजयकुमार गावित

**मुंबई/प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात 'मेरी माटी मेरा देश' हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून या अभियानात राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी सहभागी होणार असल्याचे, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितले. 'मेरी माटी मेरा देश' या अभियानाबाबत प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत मंत्री डॉ. गावित यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले की, 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमांतर्गत एका हातात माती घेऊन १० वर्षावरील आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचा सेल्फ़ी फोटो काढायचा आहे. हे फोटो प्रकल्प कार्यालयाने २३ ऑक्टोबर २०२३ पर्यत त्यांना देण्यात येणाऱ्या लिंक वर अपलोड करायचे आहेत. या बैठकीस आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, उपसचिव र. तु. जाधव, तसेच दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सर्व अपर आयुक्त, प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अपघात रोखण्यासाठी आरटीओ फिरते पथक

**वसई/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील महामार्गावर आरटीओच्या नियमबाह्य वाहतुकीला आळा घालण्यासाठी तीन पथके तैनात करण्यात आली आहेत. कल्याण, पालघर व ठाणे या पथकांद्वारे १८ अधिकारी व कर्मचारी मुंबई अहमदाबाद महामार्गावर घोडबंदर ते आच्छाड या मार्गावर तपासणी करीत आहेत. या मार्गावर अपघात रोखण्यासाठी आरटीओने २४ तास फिरते पथक तैनात केले आहे. या ठाणे, पालघर व कल्याण येथील आरटीओ पथकाचा समावेश असून घोडबंदर ते आच्छाड या मार्गावर वाहनांची तपासणी सुरु असून गेल्या १५ दिवसात १ हजार ३३२ वाहनांची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४७९ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. महामार्गावर अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. मात्र वाहन चालक भरधाव वेगाने वाहन चालवित असल्याने ते अपघाताला कारण ठरत आहेत. त्यामध्ये अनेकांचा बळी जात असून अपघातग्रस्तांना त्यांचे अवयव निकामी होऊन अनेकांचा दुर्घटनांमध्ये बळी जातो. भरधाव वेगाने चालणारी वाहने अपघाताला कारण ठरत आहेत. अवयव निकामी झाल्याने अपंगत्व येते. तसेच महामार्गावरुन बेकायदा प्रवासी वाहतूक केली जाते. अलिकडेच समृद्धी महामार्गावर वाढते अपघात लक्षात घेऊन प्रवासी वाहतुकीकडे कटाक्षाने पोलिस प्रशासन पाहत आहे. महामार्गावर असणारी अपघाती वळणे अनेकदा चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दुर्घटना होतात. अपघातांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी ही मोहीम राबविण्यात आली आहे. आरटीओच्या मोहिमेच्या पथकात ठाणे जिल्ह्यातील अधिकारी आहेत. उपप्रादेशिक परिवहन विभागाचे उपायुक्त व रस्ता सुरक्षा वाहतूक कक्ष अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिम राबविली जात आहे. अती वेगाने वाहन चालविणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. जीवावर उदार होऊन हे वाहन चालक अती वेगाने वाहन चालवितात, असे दिसून आले आहे. अती वेगाने वाहन चालविणे १४१, चुकीच्या मार्गीकेतून वाहन नेणे ४८, विना सीट बेल्ट प्रवास करणे ४६, वाहनांचे चुकीचे पार्किंग ३४, वाहन दिवे चालू नसणे १८, विना रिफ्लेक्टर वाहने १०८, क्षमतेपेक्षा जादा प्रवासी २, मोबाईलवर बोलणे १५, तंदुरुस्ती प्रमाणपत्र नसणे ६८, विमा नसणे ५१, विना परमिट १४, विना परवाना प्रवासी वाहतूक ४ अशी कारवाई करण्यात आली आहे.

23 TO 29 OCTOBER 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 10/21/2023 9:04 PM Page 1



# पालघर जिल्ह्यात पहिल्या क्रमांकावर भाजपला आणायचेय -भरत राजपूत

**वाडा/प्रतिनिधी**

आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पालघर जिल्ह्यात भाजपला निर्विवाद यश मिळविण्यासाठी कार्यकर्त्यांनी आपसांतील मतभेद विसरून काम करावे. उमेदवार कोण हे पक्षाचे नेते ठरवतील. आपण कार्यकर्ता म्हणून निष्ठेने काम करायचे असून जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाला पहिल्या क्रमांकावर आणायचे आहे. असे प्रतिपादन भाजपचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष भरत राजपूत यांनी वाड्यातील कार्यकर्ता मेळाव्यात केलं. भाजपचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजपूत यांनी जिल्हाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मंगळवारी मोखाडा, जव्हार, विक्रमगड आणि वाडा या तालुक्यांचा दौरा केला. शंभराहून अधिक गाड्यांचा ताफा सोबतीला घेत शेकडो कार्यकर्त्यांसह ह्या दौऱ्याच्या माध्यमातून राजपूत यांनी एकाप्रकारे शक्तिप्रदर्शन करत जिल्ह्यात वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. यावेळी वाड्यातील पी. जे. हायस्कूलच्या स्वातंत्र्यसैनिक के. डी. गंधे सभागृहात झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात मार्गदर्शन करताना त्यांनी वरील उद्गार काढले. ते पुढे म्हणाले पालघर लोकसभेत भाजपलाच उमेदवारी मिळायला हवी. पालघर जिल्हा भाजपचा बालेकिल्ला असताना मित्र पक्षाला जागा सोडणे म्हणजे वर्षानुवर्षे रक्ताचे पाणी करून पक्ष रुजवणाऱ्या कार्यकर्त्यावर अन्याय करणारे आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत पालघर लोकसभेत



पक्षातीलच कार्यकर्त्याला उमेदवारी मिळावी पक्षाबाहेरून उमेदवार आयात करू नये यासाठी पक्षनेतृत्वाकडे विनंती करणार आहोत. ज्या दिवंगत माजी खासदार चिंतामण वनगा आणि माजी मंत्री विष्णू सवरांच्या नेतृत्वाखाली पालघर जिल्ह्यात पक्ष शून्यातून शिखरावर पोहचला, खासदार, आमदार निवडून आले, पालघर जिल्ह्याच्या पहिला जिल्हा परिषद अध्यक्ष भाजपचा विराजमान झाला त्या जिल्ह्यातील खासदारकीची जागा मित्रपक्षाला जाणे आणि एकही आमदार नसणे हे आत्मचिंतन करायला लावणारे. त्यामुळे आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भाजपचेच लोकप्रतिनिधी निवडून यावेत यासाठी आपसांतील मतभेद विसरून एकत्रितपणे लढू आणि संपूर्ण जिल्ह्यात पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्ष उभा करू असा आशावाद जिल्हाध्यक्ष राजपूत यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांच्या पाठीशी सर्वशक्तीनीशी उभे राहून पक्ष संघटना अधिक मजबूतीने उभी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष म्हणून खंबीरपणे पाठबळ देण्याचा विश्वास जिल्हाध्यक्ष राजपूत यांनी कार्यकर्त्यांना दिला. भाजपचे वाडा तालुकाध्यक्ष मंगेश पाटील यांच्या तालुकाध्यक्षपदी झालेल्या पुनर्नियुक्तीनंतर झालेल्या पहिल्याच कार्यकर्ता मेळाव्याला बुथप्रमुख, शाखाप्रमुखांपासून पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह महिला कार्यकर्त्या मोठ्यासंख्येने उपस्थिती होत्या. मागील कार्यकाळात भाजपच्या बुथ पातळीवरील कार्यकर्त्यांपर्यंतची चांगली बांधणी मंगेश पाटील यांनी केल्यामुळे अल्पावधीत मेळावा आयोजित केला असतानाही कार्यकर्त्यांनी चांगला प्रतिसाद देत उपस्थिती दर्शविल्याचे दिसले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजपूत यांनी भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांशी स्वतंत्रपणे चर्चा करत त्यांची मते जाणून घेतली. या मेळाव्याला पालघर लोकसभेचे प्रमुख नंदकुमार पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाबाजी काठोले, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष कोरे कृषी सभापती संदीप पावडे, डॉ. हेमंत सवरा, सुरेखा थेतले, हरिश्चंद्र भोये, नरेश आकरे, सुशील औसरकर, वीणा देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.






## तेजस्वी योगा ग्रुप तर्फे फॅन्सी ड्रेस गरबा!

**मुंबई/प्रतिनिधी**

अंधेरी पश्चिम येथील तेजस्वी योगा ग्रुपच्या वतीने यंदा नवरात्रोत्सवात आयटीसी गार्डन वेअर हाऊस, अंधेरी पश्चिम येथे रविवारी फॅन्सी ड्रेस गरबा नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विभागातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली विजेत्यांना नगरसेवक जगदीश अण्णा व माझी नगरसेवक सुभाष सावंत यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले तेजश्री महिला ग्रुपच्या प्रमुख कल्पना इंगळे व त्यांच्या सर्व सहकारी महिलांनी हा कार्यक्रम यशस्वी करून दाखवल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. कल्पना इंगळे या सामाजिक कार्यात नेहमीच अग्रणी असतात.

## नवरात्रोत्सवा दरम्यान प्लास्टिक बंदी बाबत जनजागृती

वाडा: माझी वसुंधरा ४.० अंतर्गत ग्रामपंचायत खानिवली येथे विविध उपक्रम राबविले जात आहेत. ग्रामपंचायतीच्या वतीने दुर्गा देवीच्या मंडपात महिलांना एकत्र करुण त्यांना पन्नास मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिसव्या न वापरण्या बाबतीत जनजागृती व सिंगल यूज प्लास्टिकला पर्यायी घटकांबद्दल माहिती देण्यात आली. या वेळी उपस्थित महिलांना लोखंडी हुकचे वाटप करण्यात आले. तसेच घरातून निघणारे प्लास्टिक लोखंडी हुकाला टांगून ठेवावे ते ग्रामपंचायत कडून संकलित करण्यात येणार आहे. या वेळी सरपंच भरत हजारे, उपसरपंच सागर पाटील, सदस्य सारिका पाटील, प्रेरणा पोटिंदा,



पोलिस पाटील नितिन पाटील, अंगणवाडी सेविका सलोनी पाटील, दिपाली पाटील, पर्यावरण दूत तसेच पाटील पाडा येथील महिला उपस्थित होत्या.

## मिरॅकल फाउंडेशन संचालित शिरवली येथील व्यसनमुक्ती केंद्राचा रविवारी तेरावा वर्धापन दिन

**वसई/प्रतिनिधी**

मुंबईच्या मिरॅकल फाउंडेशन संचालित शिरवली येथील मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्र या संस्थेचा तेरावा वर्धापन दिन उद्या, रविवारी साजरा होणार असून, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईचे माजी नगरसेवक समीर देसाई आणि वसई विरारच्या माजी नगरसेविका जयश्री किणी उपस्थित राहणार आहेत. तसेच या प्रसंगी मिरॅकल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष मनराई, संस्थेचे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आरती मोहिते आणि डॉ. मनोहर यादव प्रामुख्याने उपस्थित असणार आहेत. तरी यावेळी गरजुंना लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून संस्थेचे कार्य समजून घ्यावे, असे आवाहन मिरॅकल फाउंडेशनचे समन्वयक रमेश सांगळे यांनी केले आहे. समाजात दिवसेंदिवस व्यसनांचे प्रमाण वाढत आहे. दारू, तंबाखूजन्य पदार्थ (तंबाखू, विडी, सिगारेट, गुटखा, पान मसाला) ड्रग्स अशा व्यसनांकडे तरुण पिढी जास्त प्रमाणात आकर्षित होत आहे. या व्यसनांत सर्वच स्तरातील व्यसनी व्यक्ती बळी जात आहेत. त्यांची कुटुंबे उध्वस्त होत आहेत. या व्यसनांमुळे सर्वांचीच शारीरिक, मानसिक व आर्थिक हाणी होत आहे. अशाच व्यसनांमध्ये अडकून व्यसनाधीन झालेल्या व्यक्तींना व्यसनमुक्त करण्याचे कार्य गेली तेरा वर्ष मीराकल फाउंडेशनच्या वतीने चालू आहे आणि या माध्यमातून अनेक जण व्यसनमुक्त झाले असल्याचे संस्थेचे स्वयंसेवक राजेंद्र घरत यांनी सांगितले. व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनांपासून परावृत्त करण्यासाठी आमच्या संस्थेच्या वतीने गाव, शहर, वस्ती पातळी, वास्तव्याची ठिकाणे (सोसायटी, संकुले) तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, कामगार, बांधकाम मजूर अशा प्रकारच्या सर्व स्तरातील व्यक्तींना 'व्यसने, व्यसनाधीनता व व्यसनमुक्तता' या विषयावर कार्यक्रम आयोजित करून मार्गदर्शन करण्यात येते. आमच्या 'व्यसन विरोधी जन जागृती अभियान' उपक्रमासाठी स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक, स्थानिक संस्था, स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक पोलीस यांचे सहकार्य मिळते. या सगळ्यांमुळेच आम्ही आमचा हा संकल्प प्रत्यक्षपणे कृतीत उतरवित आहोत. या तेराव्या वर्धापन दिन सोहळ्यासाठी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यानिमित्ताने होणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन सांगळे यांनी केले आहे.

पान १ वरून....

### रक्ताच्या नात्याला मोबाईलची बाधा...

हत्या केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मोबाईल घेण्यासाठी पैसे न दिल्याने मुलाने आईची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार नागपुरातून समोर आला आहे. नागपूरमध्ये एका २८ वर्षीय तरुणाने आपल्या आईला स्मार्टफोन घेण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने तिचा गळा दाबून खून केला. पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे. दरम्यान या घटनेमुळे नागपुरात खळबळ उडाली आहे. शवविच्छेदनातून गळा दाबून हा खून करण्यात आल्याचे समोर आलं आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु करण्यात आला आहे. कमलाबाई बडवाईक असे मृत महिलेचे नाव असून त्या ४७ वर्षांच्या होत्या. शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे कारण गळा दाबण्यात आले आहे. याप्रकरणी सविस्तर माहिती मिळविण्यासाठी पोलीस पथकाने तपास सुरू केला आहे. व्यसनी आणि बेरोजगार मुलाने दारुसाठी मोबाइल विकण्याच्या वादातून जन्मदात्रीची हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना १८ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास हुडरेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गजानन महाराजनगर परिसरात घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिलेचा दुसरा मुलगा दीपक याने सांगितले की, त्याला फोन आला की त्याचा भाऊ त्याच्या आईला रामनाथ रुग्णालयात घेऊन गेला आहे. रुग्णालयात उपचारादरम्यान आईचा मृत्यू झाला. जेव्हा त्याने त्याच्या आईचा मृतदेह पाहिला तेव्हा त्याला काहीतरी चुकीचे वाटले. आईचे सोन्याचे दागिनेही गायब होते. त्यामुळे दीपकला याबाबत काही शंका होत्या. त्याने ही माहिती पोलिसांना दिली. हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याने सांगितले की, दीपकचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर संशयाच्या आधारे रामनाथची चौकशी करण्यात आली. चौकशीत आईचा स्कार्फने गळा आवळून खून केल्याची कबुली रामनाथने दिली. स्मार्टफोनसाठी पैसे न दिल्याने हे पाऊल उचलल्याचे रामनाथने सांगितले. रामनाथने आईला मारहाण केल्याच्या घटना यापूर्वी घडल्या होत्या. त्यामुळे दीपकला रामनाथवर संशय आला होता. त्याने तात्काळ हुडकेश्वर पोलीस ठाणे गाठून रामनाथ विरोधात तक्रार दिली. दीपकच्या तक्रारीच्या आधारावर पोलिसांनी रामनाथला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून रामनाथला अटक केली आहे.

### शातीर पत्नीच्या षडयंत्राचा पर्दाफाश...

बुशरा व दोन मुलांसह घरी होते. बुधवारी मध्यरात्री रात्री एक ते दोनच्या सुमारास त्यांच्या पत्नी लघुशंकेला घराबाहेरील स्वच्छतागृहात गेल्या तेव्हा बाहेर दबा धरून बसलेले चार पुरुष व एका महिलेने नईमच्या त्यांना फरफटत घरात आणले आणि जबर मारहाण केली. आरडाओरडा होताच नईम यांना दरोडेखोर घरात आल्याचे दिसले. मात्र काही कळायच्या आत दरोडेखोरांनी ओढणीने त्यांचा गळा आवळला, अशी माहिती बुशराने तिच्या वडिलांना सांगितली होती. बुशराचे वडील अन्वर चिराग शेख यांनी घरी पोहोचून पोलिसांना याची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच तात्काळ अप्पर पोलीस अधीक्षक स्वाती भोर, पोलीस निरीक्षक हर्षवर्धन गवळी यांनी घटनास्थळी धाव घेत दरोड्याच्या तपास सुरू केला होता. पोलिसांनी सखोल तपास केला असता बुशराने पतीची हत्या केल्याचे समोर आलं आहे.

### संशयामुळे त्रिशरण भयंकर चिडला...

चाकू मारून गंभीर जखमी केले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता तामगांव ठाणेदार प्रमोद उलेमाले, पोउपनि दीपक सोळंके, जीवन सोनवणे आपल्या सहकाऱ्यांसह काही मिनिटात घटनास्थळी दाखल झाले. वानखेड गावातील त्या घटनास्थळी प्रचंड आक्रोश सुरु होता. एक साधारण चोवीस वर्षाचा युवक रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध पडला होता. त्याचे जवळ आई वडील, बहीण, आजी आक्रोश करत होते. त्याला उठवण्याचा प्रयत्न करीत होते. पण बेशुद्ध अवस्थेतील 'तो' युवक प्रतिसाद देत नव्हता. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या युवकाजवळ बघ्यांची तोबा गर्दी जमली होती. पोलिसांचा ताफा पाहताच अनेकांनी घटनास्थळावरून काढता पाय घेतला. जखमी युवकाजवळ रडत असलेल्या त्याच्या बहिणीने, माझा भाऊ आकाशला आमचे घरासमोर राहणाऱ्या त्रिशरण इंगळे याने चाकू मारल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी सर्वात आधी रुग्णवाहिकेद्वारे जखमी युवकास काही पोलीस कर्मचारी व नातेवाईकांसह उपचारासाठी वरवट बकाल ग्रामीण रुग्णालयात रवाना केले. फिंगरप्रिंट एक्सपर्ट यांना घटनास्थळी पाचारण करून पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा व इतर कायदेशीर सोपस्कार पूर्ण केले. आकाशला चाकू मारून गंभीर जखमी केलेला संशयीत आरोपी त्रिशरण इंगळे घरातच असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांच्या एका पथकाने हाकेच्या अंतरावर असलेल्या घरातून संशयीत आरोपी त्रिशरण इंगळे यास धारदार चाकूसह ताब्यात घेतले. उपचारासाठी वरवट बकाल ग्रामीण रुग्णालयात हलवलेल्या बेशुद्ध अवस्थेतील जखमी आकाश यास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले. दिवसाढवळ्या घरासमोरच एका युवकाचा चाकूने सिनेस्टाईल खून झाल्याने वानखेड गावासह तालुक्यात खळबळ निर्माण झाली. कोणताही अनुचीत प्रकार घडू नये म्हणून दक्षता घेत, तामगाव पोलिसांचा मोठा बंदोबस्त घटनास्थळी तैनात करण्यात आला. पोस्टमार्टम झाल्यावर शोकाकुल वातावरणात मृतक आकाशवर संध्याकाळी पोलीस बंदोबस्तात वानखेड गावात अंत्यसंस्कार करण्यात आले. मृतकची बहीण दीक्षा सुरेश परघरमोर हिच्या फिर्यादीनुसार मृतक आकाश सुरेश परघरमोर याच्या खून प्रकरणी तामगाव पोलिसांनी आरोपी त्रिशरण रामदास इंगळे याच्याविरुद्ध गु.र.नं. २४३ / २३ कलम ३०२, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात पत्नी व मयत यांच्यात प्रेम प्रकरण असल्याच्या संशयावरून शेजारी राहणाऱ्या युवकाचा निर्घृणपणे खून केल्याचे समजले. संग्रामपूरपासून सुमारे दहा कि.मी. अंतरावर असलेल्या वानखेड गावात सर्वच जाती धर्माचे नागरिक गुण्यागोविंदाने राहतात. प्रत्येक धर्माच्या सण, उत्सवात प्रत्येक गावकरी उत्साहाने सहभाग घेणारे आदर्श गांव. या गावात सुरेश परघरमोर हे कुटुंबासह राहतात. त्यांच्याकडे काही शेती असून, शेती व शेतमजुरीवर त्या कुटुंबाचा चरितार्थ चालतो. मोठा मुलगा आकाश घरच्या शेतात काम करून, दुसरीकडे मजुरी सुद्धा करत होता. त्याच्याच घरासमोर त्रिशरण रामदास इंगळे हा कुटुंबासह रहात होता.

जेसीबीवर चालक म्हणून काम करणारा त्रिशरण, कधी पुणे तर कधी गावाकडे काम करायचा. सतरा वर्षापूर्वी त्याचा विवाह झाला होता. एक मुलगी आणि एक मुलगा असताना दहा वर्षापूर्वी त्याची पत्नी अचानक बेपत्ता झाली. त्यामुळे दोन्ही अपत्याची जबाबदारी त्रिशरण वर आली. आठ वर्षापूर्वी त्याने दुसरा विवाह केला. दुसरा विवाह केल्याने मुलांची जबाबदारी घेण्यासाठी त्याला अपेक्षित जीवनसाथी लाभली होती. तिनेही त्याच्या मुलांचा सांभाळ योग्य केला. दुसऱ्या पत्नी पासून त्याला एक मुलगी झाली. जेसीबी चालक असल्याने त्याला काम असले तिथे जावे लागायचे. घरी थोडीफार शेती होती. सर्व काही सुरळीत असतांना त्याच्या मनात पत्नी बाबत संशय निर्माण झाला. घरासमोर राहणारा आकाश परघरमोर व त्याची पत्नी या दोघांचे प्रेम संबंध असावे असे संशयाचे भूत जेसीबी चालवण्यात तरबेज असलेल्या त्रिशरण याच्या मानगुटीवर बसले. संशयाने मेंदूत वारुळ केल्याने त्याचा मेंदू आतून पोखरला जात होता. एखाद्या व्यक्तीच्या मनात संशय निर्माण झाल्यावर संशय दूर करण्याऐवजी प्रत्येक गावातील ठराविक 'कळ' लावे आतून 'कळ' लावण्याचे काम 'परफेक्ट' करतात, कदाचित त्रिशरणच्या बाबतीत सुद्धा असाच काही प्रकार घडला असावा. अगोदरच पहिली पत्नी मुलांना सोडून अचानक बेपत्ता झाल्याचे 'शल्य' त्याला बरेच दिवस बोचले. त्या घटनेचा प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. त्यामुळे डोक्यातील संशयाचे 'भूत' आणखीच त्याला अस्वस्थ करत असल्याने त्रिशरण घरासमोरील आकाशला जीवे मारण्याची धमकी देत होता. संशयाच्या 'गर्तेत ' त्रिशरण क्रोधाला 'शरण' गेल्याने संशयाच्या भुताने त्याच्या मनातील क्रोधाच्या 'ज्वाला' अधिक तीव्र झाल्या. त्यामुळे आकाशला ढगात पाठवण्याची 'तो' संधी पाहत होता. दिनांक ९ सप्टेंबर रोजी त्रिशरण याने संशय घेत पत्नीस मारहाण केली. पत्नी त्याला 'असला काही प्रकार नाही, तुमच्या मनातून संशय काढून टाका' असे समजावण्याचा प्रयत्न करत होती. पण 'तो' समजण्यापलीकडे गेल्याने, जास्त भानगडीत न पडता त्रिशरणची पत्नी माहेरी निघून गेली. पत्नी निघून गेल्याने त्रिशरणच्या मनात आकाश बाबत आणखी चीड निर्माण झाली असावी. १० सप्टेंबर रविवारी सकाळी आकाश शेतात निघून गेला. आजचा उगवलेला दिवस आपल्यासाठी शेवटचा असेल, याची पुसटशी कल्पना नसलेला आकाश शेतातून काम आटोपून बारा वाजता घरी आला. आंघोळ करून आकाश घराबाहेर पडला.

सकाळपासून पाळतीवर राहत 'त्याला' संपवण्याची संधी बघत असलेला त्रिशरण घरासमोर उभा होता. आकाश घराबाहेर पडल्याचे पाहताच त्याच्याच मागे दुचाकी घेऊन त्रिशरण निघाला. काही अंतरावर आकाशजवळ दुचाकी उभी करून वाऱ्याच्या वेगाने कंबरेला खोचलेला चाकू बाहेर काढून आकाशच्या डाव्या काखेच्या खाली बरगडीत खोलवर ताकदीने भोसकला. बेसावध आकाशला काही कळायच्या आत जीवघेणा वार झाल्याने आकाश जमिनीवर कोसळला. आकाश रस्त्यावर विव्हळत रक्ताच्या थारोळ्यात पडल्यावरही क्रूर त्रिशरण त्याला लाथांनी तुडवत होता. हा प्रकार पाहून जखमी आकाशचे आई-वडील, बहीण मदतीसाठी धावले. त्याच्या तावडीतून गंभीर आकाशला सोडवण्याचा प्रयत्न करतांना आकाशच्या आईला 'आता तुला सुद्धा खुपसतो' असें म्हणत तो आईला चाकू मारेल असा अंदाज आल्यावर बहीण दिक्षामध्ये पडली. तू मध्ये पडू नको असे म्हणत त्रिशरण ओरडत असताना शोभाताई यांनी स्वतःची सुटका केली. रक्ताने माखलेला चाकू हातात घेऊन क्रोधीत त्रिशरण जखमी आकाशच्या कुटुंबियांना एक संपवला अजून काही बाकी आहेत असे म्हणून भररस्त्यावर धमकावत दहशत निर्माण करत होता. जखमी आकाशचे पूर्ण कुटुंब मात्र, आकाशला सोडून दे अशा काकुळतीला येऊन त्रिशरणला दुरूनच विनवणी करत होते. रक्ताने माखलेला धारधार चाकू हातात असलेल्या त्रिशरणचे रौद्ररूप पाहून त्याचेजवळ किंवा रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या जखमी आकाश जवळ जाण्याची हिम्मत कोणी करत नव्हते. एखाद्या चित्रपटात शोभेल असा 'तो' अंगाचा थरकाप उडवणारा 'थरारक प्रसंग परघरमोर परिवारासह काही शेजारी अनुभवत होते. भीतीने गलीतगात्र होऊन काहींनी आपल्या घरचा रस्ता पकडला. आरडा ओरड ऐकून काही गावकरी घटनास्थळी धावल्याने जमाव पाहून त्रिशरण तेथून घरी चालता झाला. घाव वर्मी लागल्याने घटनास्थळीच रक्ताच्या थारोळ्यात आकाशाचा मृत्यू झाला. मृतक आकाशच्या कुटुंबीयांनी एकच टाहो फोडला. काही वेळात आकाशचा खून झाल्याची घटना गावभर पसरली. तामगाव पोलिसांना माहिती मिळाल्याने पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. संशयातून 'क्रोधाग्नी' भडकलेल्या त्रिशरण याने चाकू भोसकून आकाशचा बळी घेतला. तर त्याच 'क्रोधाग्नी' च्या ज्वाला त्याची तुरुंगात तर परिवाराची बाहेर 'होरपळ' करतील यात शंका नाही. या घटनेचा तपास जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी देवराव गवळी तामगाव ठाणेदार पो. नि. प्रमोद उलेमाले यांचे मार्गदर्शनात पोउपनिरी दीपक सोळंके पोउपनि जीवन सोनवणे, पोहेकॉ अशोक वावगे, दयाराम कुसुंबे, प्रमोद मुळे, नापोकॉ संतोष डाखोरकर, पोकॉ. ओइंबे, गणेश डोके, सागर कांडेकर, मनीष वानखडे, सेवानंद हिवराळे, ज्ञानेश्वर फाळके करीत आहेत.

पान ८ वरून....

### राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ.किरण जाधव ...

हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी यांनी मार्गदर्शन केले. तसेच सेवा महिना कालावधीत निकाली काढलेले अर्ज, तसेच या वर्षातील प्राप्त अर्ज व निकाली काढलेले अर्ज, अपिलांवरील कार्यवाही आदी बाबींचा त्यांनी आढावा घेतला. तत्पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षाला भेट देवून तेथील सुविधांची माहिती घेतली. ग्रामीण भागातील नागरिकांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांचा लाभ अधिक गतीने मिळावा, यासाठी ग्रामस्तरीय अधिकाऱ्यांकरिता कार्यपद्धती निश्रि्चत करण्यात येईल. तसेच त्यांच्याकडे प्राप्त अर्जांचा तातडीने निपटारा होण्यासाठी नियमितपणे आढावा घेण्यात येईल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी 'मराठवाडा मुक्तिगाथा : लातूर विशेष' हा ग्रंथ भेट देवून राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांचे स्वागत केले. यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात नागरिकांना विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच अधिसूचित सेवांबाबत कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाला भेट दिली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी अधिसूचित सेवांच्या अंमलबजावणीची माहिती दिली. डॉ. जाधव यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांशी संवाद साधून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास भेट देवून अधिसूचित सेवांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक श्री. राऊत उपस्थित होते.

### कोळी समाजासाठी महर्षी वाल्मिकी...

पद्धतीने काम करावे. रक्त, नातेसंबंध तपासणी आदी बाबतीत विहीत आणि व्यावहारीक पध्दतीने कार्यवाही करावी,'असेही ते म्हणाले. या समाजाच्या प्रलंबित १२ हजार दाखल्यांचा फेरविचार करण्यात यावा, असे निर्देशही या बैठकीत देण्यात आले. यावेळी झालेल्या चर्चेत मंत्री श्री. महाजन, पाटील यांच्यासह यांनी सहभाग घेतला. आमदार रमेश पाटील, आमदार श्री. भोळे, आमदार श्री. सावकारे, प्रा. एस.जी.खानापुरे, चेतन कोळी,माजी मंत्री डॉ. भांडे यांनी विविध मुद्द्यांची मांडणी केली.

### विरार येथे रुग्णवाहिका वाहतूक ...

आणि संध्याकाळी ८ ते ९ च्या सुमारास ते गायब होतात. बहुतांश पोलीस हे अल्प कालावधीसाठीच दिसतात. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे.

### अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात...

कार्यक्षमता, उत्साह वाढवणे, तणावमुक्ती साधणे आणि कामाची गुणवत्तावृद्धी करणे या दृष्टीने श्रोत्यांना सहभागी करून घेणारे अनेक अपारंपरिक उपक्रम आणि विविध अभिनव खेळ यांच्या माध्यमातून हसतखेळत हा कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरविंद उबाळे, उपप्राचार्य डॉ अनिलकुमार शेळके आणि उपप्राचार्य डॉ. जानकी सावगाव तसेच महाविद्यालयाच्या अंतर्गत दर्जा निश्चिती कक्षाचे समन्वयक डॉ. हिरानंद खंबायत आणि महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. दिलीप वर्तक यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाविद्यालयाच्या कार्यसंस्कृतीला एक नवी ऊर्जा आणि सकारात्मक प्रेरणा प्राप्त होईल असा विश्वास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरविंद उबाळे यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमामध्ये सर्व प्रशासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला असे या कार्यक्रमाच्या आयोजक श्रीम.नीलिमा मोहोळ यांनी सांगितले.

### कंत्राटी नोकर भरतीचे पाप महाविकास ...

काळापासून त्यांनी याची सुरुवात केली सुरुवात केली. त्यामुळे महायुतीच्या सरकारने शरद पवार उद्धव ठाकरे व काँग्रेसचे पदाधिकारी या ढोंगी शासनकर्त्यांचं पाप उघड पाडला असून, राज्यातील तरुणांच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचं काम हे करीत असल्याने आम्ही त्यांचा निषेध करतो अशी प्रतिक्रिया शहराध्यक्ष अँड. हर्षल पाटील यांनी दिली आहे.

# शिक्षक आणि पदवीधारकांनी मतदार नाव नोंदणी त्वरीत करावी

## मुंबई शिक्षक, मुंबई व कोकण पदवीधर मतदार संघातील मतदारांनी मोठ्या संख्येने सहभाग घेण्याचे कोकण आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांचे आवाहन




**नवी मुंबई/प्रतिनिधी**

मुंबई पदवीधर, मुंबई शिक्षक व कोकण पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदार होऊ इच्छिणाऱ्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात पदवीधारकांनी नोंदणी त्वरीत करावी असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले. आज कोकण भवनातील समिती सभागृहात ते बोलत होते. भारत निवडणूक आयोगाकडून दि. ३० सप्टेंबर ते ३० डिसेंबर २०२३ या अर्हता दिनांकावर आधारीत शिक्षक व पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. या घोषित कार्यक्रमानूसार मुंबई पदवीधर, मुंबई शिक्षक व कोकण पदवीधर मतदारसंघाची टप्प्या टप्याने नव्याने मतदारयादी तयार करण्यात येणार आहे. भारत निवडणूकआयोगाच्या जाहीर करण्यात आलेल्या कार्यमक्रमा नूसार दि.२५ ऑक्टोबर २०२३ रोजी मतदार नोंदणी अधिनियम १९६० नुसार वर्तमानपत्रात दिलेल्या नोटीसीची द्वितीय पुर्नप्रसिध्दी करण्यात येणार आहे. दि.०६ नोव्हेंबर २०२३ रोजी नमुना-१८ किंवा नमुना-१९ द्वारे दावे व हरकती स्विकारणाचा अंतिम दिवस असेल. दि. २० नोव्हेंबर २०२३ रोजी हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई करण्यात येईल. दि.२३ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी करण्यात येईल. दि. २३ नोव्हेंबर २०२३ ते दि.०९ डिसेंबर २०२३ या कालावधीत दावे व हरकती स्विकारली जातील. दि.२५ डिसेंबर २०२३ रोजी दावे व हरकती निकाली काढण्यात येतील तसेच पुरवणी यादी तयार करुन छपाई करण्यात येईल. दि.३० डिसेंबर २०२३ रोजी मतदार याद्यांची अंतिम प्रसिध्दी करण्यात येईल.

**शिक्षक मतदार संघ** : शिक्षक मतदार संघाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या यादीमध्ये ज्या व्यक्तिंची नावे समाविष्ट आहेत. अशा सर्व व्यक्तींना सुध्दा नवीन यादी तयार करतांना विहीत नमुन्यात नव्याने अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.शिक्षक मतदार संघाच्या अर्हतेसाठी जी व्यक्ती भारताची नागरिक आहे आणि त्या मतदारसंघाची सर्वसाधारणपणे रहिवासी आहे तसेच जिने दिनांक १ नोव्हेंबर २०२३ पूर्वी लगतच्या सहा वर्षामध्ये राज्यातील एखादया माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये एकूण किमान तीन वर्ष अध्यापनाचे काम केले आहे, अशी व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट केले जाण्यास पात्र राहील. तसेच शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव दाखल करण्यासाठी सादर केलेल्या नमुना १९ मधील अर्जासोबत संबंधित व्यक्तीने दिनांक १ नोव्हेंबर २०२३ पूर्वी लगतच्या सहा वर्षामध्ये एखादया माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये एकूण किमान तीन वर्ष अध्यापनाचे काम केले असल्याबाबत शैक्षणिक संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**पदवीधर मतदार संघ** : पदवीधर मतदार संघाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या यादीमध्ये ज्या व्यक्तिंची नावे समाविष्ट आहेत. अशा सर्व व्यक्तींना सुध्दा नवीन यादी तयार करतांना विहीत नमुन्यात नव्याने अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. पदवीधर मतदार संघाच्या अर्हतेसाठी जी व्यक्ती भारताची नागरिक आहे आणि त्या मतदार संघातील सर्वसाधारण रहिवासी आहे आणि ती १ नोव्हेंबर २०२३ पुर्वी किमान ३ वर्षे भारताच्या राज्यक्षेत्रातील विद्यापीठाची एकतर पदवीधर असेल किंवा त्याच्याशी समतुल्य असलेली अर्हता धारण करीत असेल अशी प्रत्येक व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यास पात्र आहे. ३ वर्षाचा कालावधी हा ज्या दिनांकास अर्हता पदवी परीक्षेचा निकाल जाहिर करण्यात आला असेल आणि ते विद्यापीठ किंवा अन्य संबंधीत प्राधीकरण यांच्याकडून प्रसिद्ध करण्यात आला असेल त्या दिनांकापासून मोजण्यात येईल.नमुना १८ मधील अर्जासोबत पदवीशी समतुल्य म्हणून निर्दिष्ट करण्यात आलेली अर्हता (Specified Qualifications) या पुरावा स्वसाक्षांकीत केलेला व अतिरिक्त पदनिर्देशीत अधिकाऱ्यांनी अधिप्रमाणीत करुन जोडणे आवश्यक आहे. खोटे निवेदन व खोटी माहिती देणारी व्यक्ती लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० चे कलम ३१ अन्वये शिक्षेस पात्र असेल.नमुना १८ मधील छापील अर्ज मतदार नोंदणी अधिकारी-सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी-पदनिर्देशित अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मिळविता येईल. हस्तलिखीत टंकलिखीत चक्रमुद्रीत किंवा खाजगीरित्या छापलेले अर्ज देखील स्वीकारले जातील. मुंबई विद्यापीठ, खासगी विद्यापीठ यांच्यासह विविध शैक्षणिक संस्था, खासगी आस्थापना यासह विविध पातळीवरुन पदवीधारकांनी नाव नोंदवावे असे आवाहन यावेळी विभागीय आयुकत यांनी केले.

## बनावट बांधकाम परवानगी प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात आणखी तीन विकासकांवर गुन्हे दाखल!

**वसई/प्रतिनिधी**

विरार मध्ये महापालिकेच्या बनवाट बांधकाम परवागनी (सीसी) चा वापर करून अनधिकृत इमारती बांधल्याचे आणखी प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात तीन वेगवेगळ्या प्रकरणात विकासकांवर फसवणुकीसह एमआरटीपीए अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ऑगस्ट महिन्यात विरार पोलिसांनी ५५ अनधिकृत इमारतींचे प्रकरण उघडकीस आणले होते. त्यातील तपासात ११७ अनधिकृत इमारती असल्याचे निष्पन्न झाले होते. या प्रकरणानंतर पालिकेची नामुष्की झाली होती. त्यामुळे पालिकेने शहरातील अनधिकृत इमारतींचा शोध घेऊन गुन्हे दाखल करण्यास सुरवात केली होती. विरार मध्ये अशाच प्रकारे बनावट बांधकाम परवानगीचा (सीसी) वापर करून निवासी इमारत बांधल्याचे उधड झाले आहे. प्रभाग समिती ‘सी’ (चंदनसार) चे प्रभारी सहाय्यक आयुक्त अजय चौकेकर यांनी याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मेसर्स सिध्दीविनायक बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे किशोर पाटील यांनी २०१० पासून मौजे विरार सर्व्हे नंबर १६९, हिस्सा नंबर ९ येथे ‘साई स्वप्न’ अपार्टमेंट बिल्डिंग क्रमांक १ च्या ए बी सी आणि डी अशा ४ विंग बनवाट बांधकाम परवानगी तयार करून बनविल्या आणि त्यातील सदनिका विक्री केली होती. २०१५ मध्ये मेसर्स वरद विनायक बिल्डर्स ण्ड डेव्हलपर्स चे भागीदरार ज्ञानेश्वर पाटील यांनी याच साई स्वप्नमध्ये दुसरी अनधिकृत इमारत तयार केली होती. २००९ मध्ये मेसर्स श्री कन्स्ट्रक्शन तर्फे धनेश पाटील यांनी विरार सर्वे नंबर १७५ हिस्सा नंबर ७ या जागेवर ‘साईराज अपार्टमेंट’ ही अनधिकृत इमारत बनाव बांधकाम परवानगी तयार करून बनवल्याचे निष्पन्न झाले आहे. कुठला गुन्हा दाखल या तिन्ही प्रकरणा विरार पोलीस ठाण्यात विकासकांवर भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना व नियोजन अधिनियम १९६६ च्या कलम ५२, ५३, ५४ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## खा. राजेंद्र गावीत यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र शासन पुरस्कृत योजनासाठी वसई विरार पालिकेत दिशा समितीची बैठक संपन्न




**पालघर/एच. लोखंडे**

पालघर हा महाराष्ट्र राज्यातील ३६ वा जिल्हा. जिल्ह्याचे ५ हजार ३४४ चौ. किमी शेत्रफळ असून, जिल्ह्यात सागरी, डोंगरी, शहरी भागाचा समावेश असून, लोकसंख्या अंदाजे २९ लक्ष, ९० हजार, ११६ एवढी आहे. जिल्हा ग्रामीण आणि शहरी भागात विभागात विभागला आहे. या अनुषंगाने केंद्र सरकारच्या योजनांविषयी एका बैठकीत चर्चा न करता दोन भागात करण्यात येत आहे. केंद्र शासन पुरस्कृत योजना जिल्हा विकास समन्वय आणि सनियंत्रण (दिशा) समिती सभा आज दिनांक १८ ऑक्टोबर २०२३ सकाळी ११ वाजता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सभागृहात माननीय खासदार राजेंद्र गावित यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीत केंद्र शासनाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. राजेंद्र गावित खासदार यांनी वसईकरांसाठी केंद्र शासनाकडून मंजूर करवून आणलेल्या घनकचरा प्रकल्प, सांडपाणी आदी प्रकल्पाची माहिती, तसेच पंतप्रधान आवास योजना, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम, वैद्यकीय आरोग्य आणि दीनदयाळ अंत्योदय योजनेंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान आदींविषयी विस्तृत आढावा घेण्यात आला आहे. योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्यासाठी कोणते उपाय राबवावेत, योजनांसाठी नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य कशाप्रकारे सुरू आहे याबाबतचा आढावा घेतला गेला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना योजना राबवण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. सदर या दिशा समितीच्या बैठकीत वसई विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार, शेखर घाडगे, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार अविनाश कोष्ठी, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे, मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड आणि अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचे हित जोपासणाऱ्या संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्यास ऊस द्या -चेअरमन बाजुळगे

**औसा/प्रतिनिधी**

येथील संत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखान्याचा हंगाम सन २०२३ -२४ च्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदिपन कार्यक्रम ह.भ.प.महेश महाराज, माकणीकर यांच्या शुभ हस्ते व कारखान्याचे चेअरमन गणपती बाजुळगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.याप्रसंगी कारखान्याचे चेअरमन यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना म्हणाले की,मारूती महाराज कारखाना परीसरातील इतर कारखान्याच्या तुलनेत जास्त भाव देवुन शेतकरी विकास व आर्थिक हित हे उदिष्ठ डोळयासमोर ठेवून मा. दिलिपरावजी देशमुख यांच्या कुशल नेतृत्वाखाली वाटचाल करीत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गाळप क्षमता वाढविल्यांने हा कारखाना यंदाच्या गळीत हंगामात ३ लाख मेट्रिक टनपेक्षा अधिक ऊस गाळप पुर्ण क्षमतेने करणार असल्याची माहिती यावेळी चेअरमन गणपतराव बाजुळगे यांनी दिली. तसेच कारखानांची गाळप क्षमता वाढल्याने शेतकऱ्यांमधून मोठ्या प्रमाणात आनंद सुरू असून मागील हंगामात परिसरातील इतर कारखान्यापेक्षा जास्त भाव दिल्यामुळे शेतकरी समाधानी भावना व्यक्त करत आहेत.त्यामुळे या हंगामात शेतकऱ्यांनी कुणाच्याही भुलथापांना बळी न पडता शेतकऱ्यांचे हित जोपासणाऱ्या या मारूती महाराज साखर कारखान्यासच ऊस द्यावा असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी बोलताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केले. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे राजेंद्र मोरे औसा, बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र भोसले राजीव कसबे व इतर मान्यवराच्या यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. तत्पुर्वी होमहवन पुजा विधी मा संचालक श्री व सौ विलास व्यंकटराव शिंदे पाटील सपत्नीक यांचे शुभहस्ते पार पडला. लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने उभा राहिलेला बेलकुंड येथील संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्याचा यंदाच्या गळीत हंगामातील बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा ह.भ.प महेश महाराज माकणीकर यांचे शुभ हस्ते गुरुवारी संपन्न झाला. यावेळी संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन गणपती बाजुळगे, उपाध्यक्ष शाम भोसले, संचालक सचिन पाटील, शामराव साळुंके, विलास पाटील, सुरेश भुरे तसेच ऊस उत्पादक सभासद शेतकरी अधिकारी चिफ इंजिनिअर सुनिल पवार, चिफ केमिष्ट आण्णासाहेब मोरे, मुख्य शेतकी अधिकारी, शाम शिंगारे, गोपाळ चव्हाण, कार्यालयीन अधिक्षक सुर्यकांत सावंत तसेच कर्मचारी व कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमांचे प्रस्ताविक सचिन पाटील यांनी केले तर आभार प्रभारी कार्यकारी संचालक आर. बारमदे यांनी केले.




## भिवंडीत अतिक्रमणांवर पालिकेचा हातोडा



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना सर्वसामान्य नागरिकां सोबत वाहन चालकांना करावा लागत आहे. या वाहतूक कोंडीस रस्त्यावर झालेल्या अतिक्रमण, रस्त्यालगत दुकानांनी वाढवलेले अतिक्रमणे हे सुद्धा कारण ठरत असल्याने याबाबत अनेक तक्रारी पालिका प्रशासनाकडे येत असल्याने पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त सुदाम जाधव,फैजल तातली यांनी वंजारपट्टी नाका या वर्दळीच्या परिसरात रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या हातगाडा,जागा अडवून बसलेल्या टपऱ्या तसेच दुकानांच्या वाढीव अतिक्रमणांवर पालिका पथकाने जेसीपीच्या सहाय्याने कारवाई करीत रस्ता मोकळा केला आहे.

## पदवीधर मतदार संघात ठाणे जिल्हा महत्वाची भूमिका बजावणार -वरुण सरदेसाई

**भिवंडी/प्रतिनिधी**

कोकण पदवीधर मतदार संघात ठाणे जिल्हा महत्वाची भूमिका बजावणार असून, भिवंडी लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी मोठी आहे त्यासाठी युवासेने सह सर्व शिवसैनिकांनी पदवीधर मतदार संघातील मतदार नावनोंदणी साठी जोरदार प्रयत्न करावेत असे आवाहन शिवसेना तथा युवासेना सचिव वरूण सरदेसाई यांनी भिवंडीत केले. ते भिवंडी लोकसभा पदवीधर मतदारसंघ मतदार नोंदणी कार्यक्रमा साठी शिवसैनिकांच्या मार्गदर्शन सभेत बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर भिवंडी शहापुर ग्रामीण जिल्हा प्रमुख विश्वास थळे, भिवंडीजिल्हा प्रमुख मनोज गगे, उपजिल्हा प्रमुख तुळशीराम पाटील, प्रकाश भोईर, युवासेना जिल्हाध्यक्ष ॲड अल्पेश भोईर, सोन्या पाटील, भिवंडी शहर प्रमुख प्रसाद पाटील, तालुका प्रमुख कुंदन पाटील, महिला ठाणे जिल्हा ग्रामीण संघटक कविता भगत, शहर महिला संघटक वैशाली मेस्त्री,जिल्हा परिषद माजी अध्यक्षा मंजुषा जाधव, तालुका महिला संघटक फशिताई पाटील, जिल्हा सचिव जय भगत, तालुका सह संपर्क सचिव अरुण पाटील, जिल्हा समन्वयक सुनील भगत,




युवासेना जिल्हा सचिव राजू चौधरी, जिल्हा सचिव राजा पुण्यार्थी, शहर सचिव महेंद्र कुंभारे यांसह मोठ्या संख्येने भिवंडी लोकसभा क्षेत्रातील तालुका, शहर आणि विधानसभामधील शिवसेना, युवासेना, महिला आघाडी व सर्व संलग्न संस्थाचे जिल्हा प्रमुख, उपजिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख, शहर प्रमुख व उपतालुका प्रमुख व त्यावरील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. ही निवडणुक संघटनेसाठी महत्वाची असून संघटनेची कार्यकर्त्यांची निवडणुक म्हणून ही ओळखली जात असल्याने शिवसैनिक किती क्षमतेने काम करीत आहेत हे या मतदार नाव नोंदणी वरून स्पष्ट होईल असे सांगत मतदार नाव नोंदणीसाठी वेळ कमी आहे, त्यासाठी मुदतवाढ मिळेल की नाही हे सांगता येत नाही त्यासाठी हाती राहिलेल्या वेळेत जास्तीत जास्त मतदार नावनोंदणी करणे गरजेचे आहे, त्यासाठी शाखा प्रमुखासह सर्व पदाधिकारी यांनी जबाबदारी घेणे गरजेचे आहे असे आवाहन शेवटी वरुण सरदेसाई यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी युवासेना जिल्हाध्यक्ष ॲड अल्पेश भोईर यांनी भिवंडी लोकसभा क्षेत्रात किमान २० हजार पदवीधर मतदारांची नोंद करणार असल्याचे सांगितले तर युवासेना पदाधिकारी राजू चौधरी, युवासेना तालुकाध्यक्ष पंकज घरत, युवासेना भिवंडी शहर अधिकारी सुरेंद्र गुळवी, मोहन पठाडे यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. तर कार्यक्रमाच्या शेवटी वरुण सरदेसाई यांनी संपूर्ण भिवंडी लोकसभेतील तालुका, शहर व विधानसभा नुसार कोकण पदवीधर निवडणूक नोंदणी संदर्भात प्रत्यक्ष पदाधिकारी यांच्याशी बोलून आढावा घेतला आहे.

## रामबाग येथील जिल्हा परिषदेतच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य




**सफाळे/प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ सफाळे तर्फे सफाळे जवळील जिल्हा परिषद शाळा रामबाग येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ सफाळेचे अध्यक्ष दिनकर वर्तक, सचिव नितीन वर्तक, उपाध्यक्ष प्रमोद पाटील, माजी अध्यक्ष भालचंद्र चौधरी, विकास वर्तक, कमळकर चौधरी, नरेश पाटील, ड.नवीन घरत, मनोहर जोशी, कुंदन राऊत, शाळेच्या शिक्षिका मोनिका संखे आदी उपस्थित होते. या शैक्षणिक साहित्य बरोबरच परिसरातील वाडी मध्ये काम करणाऱ्या मजुरांना लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष भालचंद्र चौधरी यांच्याकडून टॉवेल देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लायन्स क्लब ऑफ सफाळेचे उपाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी करताना लायन्स क्लब ऑफ सफाळेचे सर्विस चेअरपर्सन भालचंद्र चौधरी यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम साकार होत असल्याचे सांगितले. लायन्स क्लबचे अध्यक्ष दिनकर वर्तक आणि सचिव नितीन वर्तक यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

## अन्न सेवनाने मानवी शरीरीला बळ मिळते तर वाचनातून आत्मबळ मिळते -डॉ.जयद्रथ जाधव

**लातूर/प्रतिनिधी**

व्यक्ती, समाज व राष्ट्राच्या मूलभूत व सार्वजनिक विकासासाठी वाचन फार महत्त्वाचे आहे. वाचनाने सुसंस्कृत, सभ्य व ज्ञानवंत समाज निर्माण होतो. अन्न सेवनाने शरीराला बळ मिळत असते तर वाचनाने आत्मबळ मिळते म्हणून प्रत्येकाने वाचनाची सवय लावणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन शिवाजी महाविद्यालय रेणापूर येथील मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.जयद्रथ जाधव यांनी केले. यावेळी ते जे.एस.पी.एम.शिक्षण संस्था लातूर संचलित स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक महाविद्यालय कबंळ रोड लातूर येथे देशाचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस व वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य अभय वावरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा.दयानंद हासबे हे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलातना प्रा.डॉ.जाधव म्हणाले की, भारतीय समाज हा वाचनापासून अलिप्त राहतो, पण मानवी समाजाची वाचन ही मूलभूत गरज झाली पाहिजे. यासाठी शालेय जीवनापासून वाचनाचा संस्कार विद्यार्थ्यांवर करणे गरजे आहे. शाळा तेथे ग्रंथालय असावे व वाचनासाठी शाळेत एक तास वेळ द्यावा. वाचनामुळे मनोरंजन, कल्पनाविलास, समाज, संस्कृतीचे आकलन होऊन नवज्ञाननिर्मिती होते. अभिजात पुस्तके वाचनामुळे आनंदाबरोबर वर्तनात बदल होतो. असे विचारही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अभय वावरे यांनी केले. यामध्ये त्यांनी वाचनाचे विद्यार्थी जीवनात महत्त्व कसे आहे ते सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकून वाचनाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सोहेल शेख यांनी केले तर आभार प्रा.दयानंद हासबे यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अर्नाळा समुद्रकिनारी अनोळखी इसमाचे मृतदेह आढळला



विरार : अर्नाळा पोलीस ठण्याच्या हद्दीत एका इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. हा इसम कळंब समुद्रातील पाण्यात बुडवून मयत झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलीसांनी व्यक्त केला आहे. परतू या प्रकरणी कुठलाही संशयाचा प्रकार नसल्याचे सांगण्यात आले. अनोळखी मयत इसमाचे वय अंदाजे २५ ते ३० वयोगटातील रंग अंगात नेसूरी निळ्या रंगाचा लाल सफेद रंगाचा टिपक्या टीर्शट तसेच डोक्यावर बारीक केस या अनोळखी मयत इसमाचे नातेवाईकांचा किंवा या बद्दल कोणास काही माहिती मिळाली तर अर्नाळा पोलीस ठाण्यात संपर्क करावा. याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एम.एम. सोनवणे करीत आहेत.

23 TO 29 OCTOBER 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 10/21/2023 9:05 PM Page 1



# राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ.किरण जाधव यांनी घेतला महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांचा आढावा!



**लातूर/प्रतिनिधी**

नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि कालबद्ध सेवा मिळावी, यासाठी राज्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम लागू करण्यात आला आहे. या अधिनियमांतर्गत अधिसूचित विविध शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना नियत कालावधीत देण्यासाठी प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी अधिक संवेदनशीलपणे काम करावे, अशा सूचना छत्रपती संभाजीनगर विभागाचे राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी येथे दिल्या. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अपर जिल्हाधिकारी सुनील यादव, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. समीर जोशी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच.व्ही. वडगावे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांसाठी प्राप्त अर्जांचा निपटारा नियत कालावधीत होण्याचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. अर्ज प्रलंबित राहू नयेत, यासाठी संबंधित विभाग प्रमुखांनी नियमितपणे आढावा घेवून पाठपुरावा करावा. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त पदनिर्देशित अधिकाऱ्यांच्या कामगिरीचा वार्षिक अहवाल तयार करून अधिनियमांतर्गत आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. जाधव यांनी यावेळी दिल्या. नागरिकांना जास्तीत जास्त सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांमधून त्यांना उपलब्ध होवू शकणाऱ्या सेवांची माहिती ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावी, असे राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. जाधव यांनी सांगितले. तसेच काही सेवा ह्या विविध विभागांशी संबंधित असून त्याबाबतचे अर्ज निकाली काढताना संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. दरम्यान महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांचा नागरिकांना लाभ देताना करावयाची कार्यवाही, अधिनियमातील विविध कलमांतील तरतुदी, आपले सरकार सेवा केंद्र, अपिलावरील कार्यवाही, अपिलीय अधिकारी यांची कर्तव्ये आदी बाबींविषयी राज्यसेवा ...पान ६ वर

# बोईसर वनक्षेत्रपाल कार्यालयाला लाल बावट्याचा घेराव




**पालघर/एच.लोखंडे**

पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात असलेले आदिवासींच्या वन हक्क जमिनींचे दावे गेल्या अनेक वर्षापासून वनविभागाच्या कार्यालयातच पडून असल्याने, त्यावर वन विभाग जाणिव पुर्वक दुर्लक्ष करत असल्याने आदिवासी बांधवांची फसवणूक होत आहे. यासाठी आदिवासी बांधवांचा अखेर आक्रोश तीव्र झाला. व दिनांक १८ ऑक्टोबर २०२३ रोजी शेकडो च्या संख्येने एकत्र येत. बोईसर एसटी डेपो बोईसर पश्चिम येथे एकत्र येऊन, मोर्चा काढुन वनविभाग बोईसर यांच्या वन शेत्रपाल कार्यालय बोईसर पश्चिम कार्यालयस घेराव घालण्यात आलेला. शिष्टमंडळ चर्चेला कार्यालयात न जाता, वनविभागाचे अधिकारी यांना मोर्चाला समोरे यावे लागते. पिढ्यान पीढ्या पासुन कसत असलेली वन जमिनी, एका दिवसात मोजणी करावी, प्रलंबित दाव्यांची हलगर्जीपणा केल्याने, त्यावर दफ्तर दिरंगाई कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात यावे. वन विभागाची लाकडांची तस्करी करणाऱ्या विरोधात पाच दिवसांत गुन्हे दाखल करण्यात यावे.

या प्रकारे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. आंदोलनाचे नेतृत्व भारताचा मार्क्सवादी लेनिनवादी पक्ष लाल बावटा पक्षाने तालुका कमिटी सचिव कॉ. नरेश शिरोंदे, अखिल भारतीय किसान संघटनेचे अध्यक्ष व माजी सरपंच कॉ. नरेश लहागें, जिल्हा कमिटी सदस्य जिल्हा सचिव कॉ. शिवराम पाटील कॉ. अन्या मोर लोकशाही महिला संघटनेच्या तालुका अध्यक्ष सविता महालोडा जिल्हा कमिटी सदस्य कॉ. शेरु वाघ उपस्थित होते. सदर माहिती कॉ. शेरू वाघ यांच्या कडून मिळत आहे.

# मराठा आरक्षणासाठी आकाश पाटील यांचे उपोषण



**औसा/प्रतिनिधी**

मराठा क्रांती ठोक मोर्चा नंतर सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा शैक्षणिक व नौकरी क्षेत्रामध्ये आरक्षण देऊन मराठा समाजाचे मागासले पण दूर करावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर आंदोलन सुरू असून एरंडी तालुका औसा येथे आकाश प्रकाश पाटील यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या उपोषणास विविध राजकीय पक्षासह सामाजिक संघटनांचे पदाधिकारी भेट देऊन पाठिंबा देत आहेत. माजी आमदार दिनकरराव माने, महाराष्ट्र राज्य बाजार समिती महासंघाचे राज्य उपाध्यक्ष संतोष सोमवंशी यांनी भेट दिली तर औसा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनीही आकाश पाटील यांची उपोषण स्थळी भेट देऊन मराठा आरक्षणाबाबत आपण शासन स्तरावर प्रयत्न करू अशी आश्वासन दिले. दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी आमदार अभिमन्यू पवार यांनी आकाश पाटील यांच्या उपोषणास आपला पाठिंबा असल्याचे लेखी पत्र दिले असून भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष सुभाष जाधव, लातूर जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, औसा तालुका रोजगार हमी योजना समितीचे अध्यक्ष सदाशिव जोगदंड, माजी नगरसेवक गोपाळ धानोरे, आणि गणेश कोल्हाळे यांच्या शिष्टमंडळाने आकाश पाटील यांना आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठिंब्याचे पत्र दिले.

# कोळी समाजासाठी महर्षी वाल्मिकी महामंडळ स्थापनेबाबत सकारात्मक प्रयत्न -मुख्यमंत्री शिंदे

## एसटी प्रवर्ग मागणीच्या विचारार्थ निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती

**मुंबई/प्रतिनिधी**



कोळी समाजासाठी महर्षी वाल्मिकी महामंडळ स्थापन करण्याबाबत सकारात्मक पावले उचलली जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली. तसेच महादेव, मल्हार व टोकरे कोळी समाजाच्या अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याच्या मागणीवर विचार करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला. या समाजाच्या विविध मागण्या तसेच जातीचे दाखले, वैधता प्रमाणपत्र विषयावर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली. बैठकीत कोळी समाजाला न्याय देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. या बैठकीस आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, आमदार रमेश पाटील, आमदार सुरेश भोळे, आमदार चिमणराव पाटील, महसूल व वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, माजी आमदार शिरीष चौधरी उपस्थित होते. तर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आमदार संजय सावकारे, माजी मंत्री डॉ. दशरथ भांडे दृकश्राव्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. या समाजाच्या जातीचे दाखले व वैधता विषयक उच्च व सर्वोच्च न्यायालयातील विविध निकालांचा विधी व न्याय विभागाकडून मत मागवण्यात यावे. तसेच आदिवासी विभागाच्या कार्यालयातील अधिकारी जळगाव येथेही उपस्थित राहून कामकाज पाहतील अशी व्यवस्था करण्याचे निर्देशही, मुख्यमंत्र्यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, ‘कोळी समाजाला न्याय देण्याची आमची भूमिका आहे. त्यामुळे त्यांचा अनुसूचित जमाती मध्ये समावेश करण्याच्या दृष्टीने सर्वकष आढावा घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी जुन्या काळातील नोंदी आदी गोष्टींची माहिती एकत्र करुन त्यांचा अहवाल तयार करावा लागेल. त्यादृष्टीने या मागणीचा विचार करण्यासाठी ही समिती समाज बांधव तसेच तज्ज्ञ आदींशी समन्वय साधून शिफारशी करेल. ही समिती कालबद्ध पद्धतीने काम करेल. या दरम्यान आदिवासी विभागाने या समाजाला जातीचे दाखले देताना काटेकोरपणे आणि विहीत ...पान ६ वर

# विरार येथे रुग्णवाहिका वाहतूक कोंडीत अडकली; रुग्णाची प्रकृती चिंताजनक!

## वाहतूक पोलिसांची १२ तासांची ड्युटी ४ तासात संपते!

**विरार/प्रतिनिधी**




वसई-विरार शहरातील रस्त्यांवरील वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. मुख्य रस्ते, चौक, चौकांवर वाहतूक कोंडीची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. रुग्णवाहिकाही यात तासन्तास अडकून राहतात. १० मिनिटांचे अंतर अर्ध्या तासात कापले जाते. मंगळवारी विरार पूर्वेतील मजीठिया नाका येथे वाहतूक पोलिसांच्या अनुपस्थितीमुळे रुग्णवाहिका जाममध्ये अडकली, त्यात रुग्ण वेळेवर रुग्णालयात न पोहोचल्याने त्याची प्रकृती चिंताजनक बनली. वसई-विरारमध्ये वाहनांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. येथील मुख्य रस्ते नेहमीच जाम असतात. रस्त्यांवर शेकडो बेकायदा रिक्षा स्टॅण्ड असल्याने वाहतूक कोंडीचे मुख्य कारण बनले आहे. अशीच एक घटना विरारमधून उघडकीस आली असून मंगळवारी मजीठिया नाक्याजवळ वाहतूक पोलिसांच्या अनुपस्थितीमुळे एक रुग्णवाहिका जाममध्ये अडकली. सुदैवाने काही सजग रिक्षाचालकांच्या मदतीने रस्त्यावरील कोंडी दूर करून रुग्णवाहिका दुसऱ्या दिशेकडून बाहेर काढण्यात आली. विरार पूर्व रेल्वे स्थानकाजवळील मजीठिया नाका हा सर्वाधिक गर्दीचा परिसर मानला जातो. त्यामुळे येथे दोन शिफ्टमध्ये वाहतूक पोलिसांची ड्युटी लावली जाते. मात्र येथे तैनात असलेले वाहतूक पोलीस २४ तासच ड्युटी करतात, हे अत्यंत दुर्दैवी आहे. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ...पान ६ वर


# कोकण विभागीय माहिती कार्यालय निर्मित अधिस्वीकृती संदर्भ पुस्तिकेचे माहिती महासंचालकांच्या हस्ते प्रकाशन!

**नवी मुंबई/प्रतिनिधी**



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी तयार केलेल्या अधिस्वीकृती संदर्भ पुस्तिकेचे प्रकाशन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महासंचालक श्रीमती जयश्री भोज (भाप्रसे) यांच्या हस्ते आज मंत्रालयात करण्यात आले. राज्यातील वत्तपत्रे, वृत्तसंस्था, इलेक्टॉनिक प्रसारमाध्यांमध्ये वृत्तविषयक काम करणाऱ्या पत्रकार प्रतिनिधींना अधिस्वीकृती पत्रिका देण्यात येते. यासाठी शासनाव्दारे विभाग आणि राज्यस्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या प्रक्रीयेची परिपूर्ण आणि विहित माहिती नसल्यामुळे पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिकेसाठी अर्ज करताना अडचणी येतात. अपूर्ण भरलेले अर्ज आणि त्रुटींमुळे हे अर्ज नामंजूर होतात. यामुळे पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिकेपासून वंचित राहावे लागते. असे होऊ नये या करिता ही अधिस्वीकृती संदर्भ पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेत पत्रकारांना देण्यात येणाऱ्या अधिस्वीकृती पत्रिकेबाबतच्या शासन निर्णयांची सोप्या शब्दांत माहिती देण्यात आली आहे. सविस्तर शासन निर्णय, नियमावली पाहण्याकरिता पुस्तिकेत दिलेल्या बारकोडवर स्कॅन करुन www.dgipr.maharashtra.gov.in या संकेत स्थळाला भेट देता येऊ शकते. या छोटेखानी कार्यक्रमास माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (माहिती व प्रशासन) हेमराज बागुल, संचालक (माहिती, वृत्त व जनसंपर्क) राहुल तिडके, उपसंचालक (वृत्त) दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रशासन) गोविंद अहंकारी यांच्यासह कोकण विभागाचे उपसंचालक (माहिती) डॉ.गणेश मुळे उपस्थित होते. सदर पुस्तिकेची निर्मिती कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या सहाय्यक संचालक संजीवनी जाधव-पाटील आणि उपसंपादक प्रविण डोंगरदिवे यांनी केली असून या पुस्तिकेचे मुखपृष्ठ चित्रकार सुशिम कांबळे यांनी तयार केले आहे. पुस्तिकेचे मुद्रण दै.कृषीवल, रायगड यांच्या सौजन्याने करण्यात आले आहे.

# १६ ग्रामपंचायत निवडणुकीसाठी ६०३ उमेदवारी अर्ज दाखल, तर दोन ग्रामपंचायती बिनविरोध!



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील निवडणुकांसाठी एकूण ६०३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये सरपंच पदा करिता ७२ जणांचा तसेच पोटनिवडणुका होत असलेल्या ९ सदस्य पदां साठीच्या उमेदवारी अर्ज दाखल केलेल्यांचा समावेश आहे. तालुक्यातील भिवंडी तालुक्यातील राहनाळ, कालवार, काटई, खोणी या मोठ्या ग्रामपंचायतींसह भोकरी, गोवे, पायगाव, दिवे केवणी, वडुनवघर, मोरणी, कुसापूर व अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या महाळुंगे, वज्रेश्वरी, नांदिठणे, पहारे, चिंचवलीतर्फे कुंदे अशा १६ ग्रामपंचायतीच्या सरपंच व सदस्य अशा एकूण १७५ तर दापोडे, खांडवळ, तळवली अर्जुनली, एकसाल या ग्रामपंचायती मधील ९ सदस्य पदांसाठी निवडणुका होत आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसां पर्यत १८४ सदस्य पदांसाठी ५३१ तर १६ सरपंच पदां करीता ७२ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. या पैकी महाळुंगे व मोरणी या पुनर्वसन वसाहत असलेल्या गावामध्ये सरपंच व सदस्य पदांच्या निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत. तर दापोडे ग्रामपंचायतींच्या ५ सदस्य बिनविरोध निवडले गेल्याने आता १६३ सदस्य पदांकरिता ५८० व १४ सरपंच पदांसाठी ७२ उमेदवार निवडणुकी च्या रिंगणात उतरले आहेत. २३ ऑक्टोंबर रोजी उमेदवारी अर्ज छाननी व २५ ऑक्टोंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रीये नंतर खरी लढत स्पष्ट होणार आहे.

# अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात संवाद कौशल्ये आणि नेतृत्वगुण विकास कार्यक्रम



**वसई/प्रतिनिधी**

वसई येथील विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या कार्यालयीन आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी नुकताच एक संवाद कौशल्ये आणि नेतृत्वगुण विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कर्मचाऱ्यांमध्ये आदरयुक्त आणि सकारात्मक संवाद वाढवणे सहकर्मचाऱ्यांमध्ये परस्परविश्वास निर्माण करणे या उद्देशाने वर्तक महाविद्यालयाच्या समुपदेशन केंद्रातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाच्या समुपदेशन केंद्राच्या प्रमुख, समुपदेशक आणि मानसोपचारतज्ञ श्रीमती निलिमा मोहोळ आणि या कार्यक्रमासाठी विशेष निमंत्रित मानसशास्त्रज्ञ श्रीमती निकोल नील सेरेजो यांनी संवादात्मक आणि सहभागी पद्धतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले. कर्मचाऱ्यांची ...पान ६ वर

# कंत्राटी नोकर भरतीचे पाप महाविकास आघाडीचे सांगत भिवंडीत भाजपाचे ‘जोडो मारो’ आंदोलन!




**भिवंडी/प्रतिनिधी**

मागील एक महिन्यांपासून कंत्राटी भरतीचा मुद्दा गाजत असताना महायुतीचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासनाचे कंत्राटी भरतीचा अध्यादेश रद्द केल्याचे जाहीर करीत कंत्राटी भरती पद्धती ही काँग्रेस राष्ट्रवादी यांच्या काळात सुरू झाली असून उद्धव बाळासाहेब ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी कंत्राटी भरती संबंधित नऊ कंपन्यांना ठेका दिला होता असा पलटवार केला.या नंतर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या आदेशा नंतर भिवंडीत भाजपा शहराध्यक्ष अँड हर्षल पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करीत शरद पवार, उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण यांच्या निषेधाच्या घोषणा देत त्यांच्या फोटोला महिला कार्यकर्त्यांनी जोडे मारून आपला संताप व्यक्त केला आहे. या आंदोलनात शहराध्यक्ष अँड हर्षल पाटील, भिवंडी पूर्व विधानसभा प्रमुख संतोष शेट्टी, सरचिटणीस राजू गाजंगी, महीला मोर्चा अध्यक्षा सुनीता टावरे, शहर उपाध्यक्ष सुमित पाटील, यशवंत टावरे, निष्काम भैरी, प्रदेश कार्यकारणी सदस्य श्याम अग्रवाल, रेखा पाटील, कल्पना शर्मा, महिला पदाधिकारी वैशाली पाटील, संगीता दोंदे, नंदन गुप्ता यांसह मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते सहभागी झाले होते. कंत्राटी भरतीचे पाप हे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या महाविकास आघाडी सरकारचे असून २००४ मध्ये काँग्रेस राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या ...पान ६ वर